Janata Education Society's

# Ajara Mahavidyalaya, Ajara

Dist. Kolhapur - 416 505



## Arts, Commerce and Science

वरिष्ठ विभाग सन २०२३-२०२४

# PROSPECTUS

AND APPLICATION FORM
(SENIOR WING)
2023-2024

जनता एज्युकेशन सोसायटी संचालित

# आजरा महाविद्यालय, आजरा.

(शिवाजी विद्यापीठ संलग्नित)
आजरा - ४१६ ५०५, जि. कोल्हापूर फोन नं. (०२३२३) २४६३७२
यु. जी. सी. २ (एफ) आणि १२ (बी) मान्यताप्राप्त
नॅक पुनर्मानांकन 'B' (2.20)

***PAST HAS GONE, FUTURE IS TO COME, NURTURE THE FUTURE***

• ajaracollege@rediffmail.com
• www.ajaracollege.ac.in

आमचे श्रध्दास्थान



स्व. काशिनाथ चराटी (अण्णा)

# जनता एज्युकेशन सोसायटी, आजरा.

ता. आजरा, जि. कोल्हापूर - ४१६५०५
फोन नंबर (०२३२३) २४६३७२, २४४२४२, २४६२४५

आमचे श्रध्दास्थान



स्व. माधवराव देशपांडे (भाऊ)

## संस्था विस्तार

- आजरा हायस्कूल, आजरा
- बापुसाहेब सरदेसाई आदर्श हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, गवसे
- एरंडोळ हायस्कूल, एरंडोळ
- पेरणोली हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, पेरणोली
- चाफवडे हायस्कूल,चाफवडे
- मडिलगे हायस्कूल, मडिलगे
- आजरा महाविद्यालय, आजरा (वरिष्ठ विभाग)
- आजरा महाविद्यालय, आजरा (कनिष्ठ विभाग)
- अण्णा भाऊ इंग्लिश मेडिअम स्कूल, आजरा
- आदर्श बालक मंदिर, आजरा
- श्री रवळनाथ बालक मंदिर, आजरा
- श्री रवळनाथ प्राथमिक विद्यामंदिर, आजरा
- दे. भ. रत्नाप्पाण्णा कुंभार मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह
- श्रीमती कमला नेहरू मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह
- आजरा महाविद्यालय मुलींचे वसतिगृह

## संस्थेची वैशिष्ट्ये

- बालवाडी ते पदव्युत्तर शिक्षण देणारी कोल्हापूर जिल्ह्यातील गुणवत्तासंपन्न शिक्षणसंस्था
- तालुक्यातील तब्बल २७४६ मुले आणि २७६५ मुलींच्या शिक्षणाची सोय
- आजरा महाविद्यालयास बी(२.२०) मानांकन, शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील माजी अग्रणी महाविद्यालय, आयकरासाठी ८० जी सुविधा.

## विद्यमान संचालक मंडळ



श्री. अशोक का. चराटी
अध्यक्ष



श्री. विलास आ. नाईक
उपाध्यक्ष



डॉ. अनिल मा. देशपांडे
मुख्य कार्यकारी अधिकारी



श्री. रमेश. जी. कुरुणकर
सचिव



डॉ. दीपक के. सातोसकर
संचालक



श्री. सुरेश ई. डांग
संचालक



श्री. विजयकुमार ल. पाटील
संचालक



श्री. दिनेश शे. कुरुणकर
संचालक



श्री. कृष्णा वि. येसणे
संचालक



डॉ. अशोक ना. सादळे
प्राचार्य

आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.

# CONTENTS
## (अनुक्रमणिका)

712


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | NAAC Certificate | : | नॅक प्रमाणपत्र |
| 2. | The College Emblem | : | महाविद्यालयाचे बोधचिन्ह |
| 3. | Aims and Objectives of the College | : | महाविद्यालयाचे ध्येय आणि उद्दिष्ट्ये |
| 4. | NAAC Core Values | : | नॅकची मूलभूत मूल्ये |
| 5. | Board of Directors | : | संचालक मंडळ |
| 6. | College Development Committee | : | महाविद्यालय विकास समिती |
| 7. | The Preface | : | प्रास्ताविक |
| 8. | Some Important Features of the College | : | महाविद्यालयाची काही ठळक वैशिष्ट्ये |
| 9. | Faculties, Courses and Subjects | : | विद्याशाखा, वर्ग व विषय |
| 10. | Rules for Admission | : | प्रवेशविषयक नियम |
| 11. | Rules for Change in the Choice of Subject | : | विषय बदलणे संदर्भात नियम |
| 12. | Information about Transfer Certificate | : | स्थलांतर दाखला मागणी अर्जाबाबत माहिती |
| 13. | Accident Insurance Policy | : | अपघात विमा योजना |
| 14. | Fees | : | महाविद्यालयाची फी |
| 15. | Merit Prizes | : | विविध गुणवत्ता पारितोषिके |
| 16. | Teaching and Non-teaching Faculty | : | शिक्षक व प्रशासकीय वृंद |
| 17. | Teaching Learning Process | : | अध्ययन आणि अध्यापन प्रक्रिया |
| 18. | Standing Committee | : | स्थायी समिती |
| 19. | Sexual Harassment Prevention Committee / | : | लैंगिक छळ प्रतिबंधक समिती |
| 20 | Senior College Student's Council | : | वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थी परिषद |
| 21. | Sport and Physical Education Committee | : | क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ |
| 22. | Knowledge Resource Committee | : | ज्ञानस्रोत मंडळ |
| 23. | Development Fund Utilization Committee | : | विकास निधी विनियोग समिती |
| 24. | Purchase Committee | : | खरेदी समिती |
| 25. | Building and Construction Committee | : | इमारत व बांधकाम समिती |
| 26. | Student Development Cell | : | विद्यार्थी विकास कक्ष |
| 27. | Caste Based Discrimination Prevention Committee | : | जाती आधारीत भेदभाव प्रतिबंध समिती |
| 28. | Grievance Redressal Cell | : | तक्रार निवारण समिती |
| 29. | Internal Quality Assurance Cell | : | अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग |
| 30. | Anti Ragging Committee | : | छळ प्रतिबंधक समिती |
| 31. | An Appeal by The Principal and Pasaydan | : | प्राचार्यांचे आवाहन व पसायदान |
| 32. | College Timings | : | महाविद्यालयाच्या वेळा |

आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

**NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Certificate of Accreditation

*The Executive Committee of the*

*National Assessment and Accreditation Council*

*is pleased to declare the*

*Ajara Mahavidyalaya, Ajara*

*Bazar Maidan, Tal. Ajara, Dist. Kolhapur, affiliated to Shivaji University, Maharashtra as*

*Accredited*

*with CGPA of 2.20 on four point scale*

*at B grade*

*valid up to February 13, 2025*

*Date : February 14, 2020*

*Director*

EC(SC)/49/[illegible] Cycle/[illegible]

आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.

# Ajara Mahavidyalaya, Ajara

## 2. The College Emblem

- The Traditional lamp (Deep) takes the human race from darkness of light. It is the symbol of Indian Culture, divinity, truth and knowledge. The pure golden flame shows the purity of character.
- The Open book below the lamp communicates the idea of open access to and dissemination of knowledge.
- The rocket at the right side of the book stands for modern scientific outlook scientific progress and speed. It also illustrates the dictum, " Sky is the limit". It launches the students in the sky of knowledge.
- The image of the factory on the left side of the book stands for the entrepreneurship, industry and commerce.
- The lamp and the flowers indicate service to community with a sense of dedication. Thus, the College emblem symbolizes the aspects of knowledge, characters and service. The emblem, we believe, communicates that our students should enrich their personalities with knowledge, character and serve the humanity with a sense of dedication.

## MISSION STATEMENT

To build the post-independence 'New India', every individual should have knowledge, character and a sense of service and dedication. In the context of the mission of the parent Society(JES), Ajara Mahavidyalaya, Ajara should constantly strive hard to educate and train the generations of the students capable to contribute to the all sided development of the region, the nation and the humanity at large.

## 3. Aims and Objectives of the College

1. To propagate the cause of education and to disseminate knowledge among the students.
2. To train the students in various skills for the all round development of their personalities.
3. To inculcate moral values and discipline among the students.
4. To strive hard for the Total Quality Improvement.
5. To educate women for their emancipation and progress.
6. To keep pace with changing educational, social and global scenario.
7. To make efforts to develop the college as a centre for community development.

# 4) NAAC Core Values (नॅकची मूलभूत मूल्ये)

**(I) Contributing To National Development :** Contributing to national development has always been an implicit global of indian HEIs. The role of HEIs is significant in human resource development and capacity building of individuals, to cater to the needs of the economy, society and the country as a whole, thereby, contributing to the development of the Nation. Serving the cause of social justice, ensuring quality and increasing access to higher education are a few ways by which HEIs can contribute to the national development.

**(ii) Fostering Global Competencies Among Students :** The spiraling developments at the global level also warrant that the NAAC includes in its scope of assessment skilled development of students, on par with their counter parts elsewhere in the world. With liberalization and globalization of economic activities, that need to develop skilled human resources of a high caliber is imperative Consequently, the demand of internationally acceptable standards in higher education is evident. This requires that the HEIs be innovative, creative and entrepreneurial in their approach. Towards achieving this, HEIs may establish collaborations with industries, network with the neighborhood agencies/bodies and foster a closer relationship between the "World of Competent - Learning" and the "World of Skilled Work".

**(iii) Inculcating a Value System Among Students:** Although skill development is crucial to the success of students in the job market skills are of less value in the absence of appropriate value systems. The HEIs have to shoulder the responsibilities of inculcating desirable value systems among students. In a country like India, with cultural pluralities and diversities, it is essential that students imbibe the appropriate values, commensurate with social, cultural, economic and environmental realities, at the local, national and universal levels. Whatever be the pluralities and diversities that exist in the country, there is a persisting concern of inculcating the core universal values like truth and righteousness apart from other values emphasized in the various policy documents of the country. The NAAC assessment therefore examines how these essential and desirable values are being inculcating in the students, by the HEIs

(iv) **Promoting the Use of Technology** : Most of the significant developments that one can observe today can be attributed to the impact of Science and Technology.

While the advantage of using modern tools and technological innovations in the day-to-day life are well recognized, the corresponding changes in the use of new technologies, for teaching learning and governance of HEIs, leaves much to be desired. Technological advancement and innovations in educational transaction have to be undertaken by all HEIs to make a visible impact on academic development as well as administration. At a time when our educational institutions are expected to perform as good as their global partners, significant technological innovations have to be adopted. Traditional method of delivering higher education have become less motivating to large number of students. To keep pace with the developments in other spheres of human endeavor, HEIs have to enrich the learning experience of their students by providing them with state of-the-art educational technologies. The campus community must be adequately prepared to make use of Information and Communication technology (ICT) optimally. Conscious effort is also needed to invest in hardware and to orient the faculty suitably. In addition to using technology as a learning resource, managing the activities of the institution in and technology-enabled way will ensure effective institutional functioning. Moving towards electronic data management and having institutional website to provide ready and relevant information to stakeholders are desirable steps in this direction. In other words, effective use of ICT in HEIs will be able to provide ICT literacy to the campus community, using ICT for a resource sharing and networking, as well as adopting ICT - enabled administrative process.

(v) **Quest for Excellence :** Contributing to nation-building and skill development of students, HEIs should demonstrate a drive to develop themselves into centres of excellence. Excellence in all that they do will contribute to the overall development of system of higher education of the country as a whole. This 'quest for excellence' could start with the assessment or even earlier, by the establishment of the Steering Committee for the preparation of the Self - Study Report (SSR) of an institution. Another step in this direction could be the identification of the strength and weakness in the teaching and learning process are carried out by the institution.

आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.

## ५. जनता एज्युकेशन सोसायटी, आजरा

संचालक मंडळ (Board of Directors)

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा. श्री. अ. का. चराटी | अध्यक्ष |
| २ | मा. श्री. बि. आ. नाईक | उपाध्यक्ष |
| ३ | मा. श्री. डॉ. अ. मा. देशपांडे | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ४ | मा. श्री. र. जी. कुरुणकर | सचिव |
| ५ | मा. श्री. डॉ. दी. के. सातोसकर | सदस्य |
| ६ | मा. श्री. सु. ई. डांग | सदस्य |
| ७ | मा. श्री. बि. ल. पाटील | सदस्य |
| ८ | मा. श्री. दि. शे. कुरुणकर | सदस्य |
| ९ | मा. श्री. कृ. वि. येसणे | सदस्य |

## ६. आजरा महाविद्यालय, आजरा

महाविद्यालय विकास समिती (College Development Committee) 2022 - 2027

| अ.क्र. | नाव | | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | मा. श्री. अशोक काशिनाथ चराटी | व्यवस्थापन अध्यक्ष | अध्यक्ष |
| २ | मा. श्री. रमेश गुरुलिंग कुरुणकर | व्यवस्थापन सचिव | सदस्य |
| ३ | मा. डॉ. अशोक विठोबा बाचुळकर | प्राचार्य नियुक्त विभाग प्रमुख | सदस्य |
| ४ | मा. डॉ. मल्हारराव रामचंद्र ढोंबरे | शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | मा. श्री. संजय बापूराव सावंत | शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | मा. डॉ. राजीव सावंता कर्पे | शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | मा. श्री. योगेश इराण्णा पाटील | प्रशासकीय सेवक प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | मा. श्री. विलास आण्णासो नाईक | व्यवस्थापन निर्देशित समाजसेवक | सदस्य |
| ९ | मा. डॉ. अनिल माधवराव देशपांडे | व्यवस्थापन निर्देशित संशोधक | सदस्य |
| १० | मा. श्री. विजयकुमार लक्ष्मण पाटील | व्यवस्थापन निर्देशित उद्योजक | सदस्य |
| ११ | मा. ॲड. सचिन संभाजी इंजल | व्यवस्थापन निर्देशित माजी विद्यार्थी | सदस्य |
| १२ | मा. डॉ. किरण गणपती पोतदार | समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता हमी समिती | सदस्य |
| १३ | मा. सभापती, महाविद्यालय विद्यार्थी परिषद | पदसिद्ध सदस्य | सदस्य |
| १४ | मा. सचिव, महाविद्यालय विद्यार्थी परिषद | पदसिद्ध सदस्य | सदस्य |
| १५ | मा. प्राचार्य, डॉ. अशोक नानासो सादळे | पदसिद्ध सदस्य | सचिव |

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

## ७. प्रास्ताविक (The Preface)

आजरा परिसरास नैसर्गिक सौंदर्याचे समृद्ध वरदान लाभले आहे. मात्र सुमारे साठ वर्षांपूर्वी आजरा परिसर औद्योगिक व आर्थिकदृष्ट्या अविकसित असल्यामुळे भीषण दारिद्र्यात जीवन व्यतीत करीत होता. याचे मूलभूत कारण शैक्षणिक मागासलेपण हेच होते. म्हणून शिक्षण क्षेत्रात मूलभूत कार्य करण्यासाठी जिद्दीने उभे राहिले पाहिजे, हे जाणून १९६२ साली 'जनता एज्युकेशन सोसायटी, आजरा' या शिक्षण संस्थेची स्थापना झाली. माध्यमिक स्तरावरील शिक्षणाची सोय करून देणाऱ्या या संस्थेने १९७५ साली कनिष्ठ महाविद्यालय सुरू केले. शासन दरबारी अखंड प्रयत्न करून १९८२ साली आजरा महाविद्यालय (वरिष्ठ) सुरू केले. प्रारंभी वाणिज्य शाखा व नंतर १९८३ साली कला शाखा सुरू करून महाविद्यालयाची वाटचाल सुरू झाली आहे. १९८५ साली कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालयास जोडले. नवनवीन शास्त्रीय शोधांनी जगाचा चेहरा मोहरा बदलत आहे हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा व त्यांना विविध शास्त्रशाखांचे ज्ञान मिळावे यासाठी १९९३ साली संस्थेने विज्ञान शाखा सुरू केली.

दरम्यानच्या काळात बदलत्या परिस्थितीबरोबरच विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार मिळवण्यासाठी व उद्योजकता विकास होण्यासाठी +२ स्तरावर व्यावसायिक शिक्षणाचे तीन अभ्यासक्रम १९९३ साली संस्थेने सुरू केले.

या विविध अभ्यासक्रमांच्या पूर्ततेबरोबर संस्थेने महाविद्यालयासाठी स्वतंत्र ग्रंथालय, शास्त्रीय व संगणकीय प्रयोगशाळा आणि २६ खोल्यांची सुसज्ज, भव्य व प्रशस्त इमारत व इतर भौतिक सुविधांची तत्परतेने पूर्तता केली आहे. महाविद्यालयाच्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावर दोन हजार विद्यार्थी सहज सामावतील असा भव्य हॉल असून त्यामध्ये कायमस्वरूपी व्यासपीठ व सुसज्ज ध्वनियोजना कार्यान्वित केलेली आहे. कार्यालय व अध्यापक कक्ष स्वतंत्र व प्रशस्त इमारतीमध्ये असून सर्व सोयींनीयुक्त आहेत. शिवाय रीडिंग हॉल, हेल्थ सेंटर, दृकश्राव्य कक्ष इ. सुविधा उपलब्ध असून यु. जी. सी. नवी दिल्लीच्या सहकार्याने विद्यार्थिनींच्यासाठी भव्य व सुसज्ज वसतिगृह बांधण्यात आले आहे. यामुळे दुर्गम व ग्रामीण भागातील गरीब आणि होतकरू विद्यार्थिनींची गैरसोय दूर झाली आहे.

एकविसाव्या शतकातील शैक्षणिक गरजांचा वेध घेऊन आजरा परिसरात अधिकाधिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या हेतूने संस्थेने महाविद्यालयात संगणकशास्त्र, संख्याशास्त्र आणि हिंदी हे विभाग जून, २००७ पासून सुरू केले आहेत. काळाची गरज ओळखून बी. सी. ए. ही नवीन विद्याशाखा जून, २००८ पासून सुरू करण्यात आली असून जून, २००९ पासून एम. ए. (अर्थशास्त्र) व एम. कॉम. (अकांऊन्टसी) चे वर्ग महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ यांच्या मान्यतेने सुरू करण्यात आले आहेत.

ज्ञान, चारित्र्य व समर्पण ही मूलभूत उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून कार्य करीत असतानाच बदलत्या सामाजिक परिस्थितीची दखल घेऊन माहिती तंत्रज्ञानाची सोय महाविद्यालयात करण्यात आलेली आहे. कालानुरूप ज्ञान, व्यक्तिमत्त्व विकास, शारीरिक, मानसिक व वैचारिक घडण आणि विविध नवनवीन क्षेत्रात जबाबदारी स्वीकारून ती उत्तम प्रकारे पार पाडण्याची क्षमता असणारे विद्यार्थी घडविणे हे व्यापक उद्दिष्ट ठेवून तसा जाणीवपूर्वक प्रयत्न आपण या महाविद्यालयात करीत आहोत. या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या विभागांतर्गत सर्वच उपक्रमांत विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्साहाने भाग घेणे आवश्यक आहे.

शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २००५-२००६ पासून अग्रणी महाविद्यालय योजना (Lead College) सुरू केली. या योजनेंतर्गत महाविद्यालयाच्या समूहामध्ये विद्यार्थीकेंद्रित उपक्रम राबविले जातात. या योजनेंतर्गत विद्यापीठाने सुविधा आणि गुणवत्तेच्या आधारे महाविद्यालयास अग्रणी महाविद्यालय म्हणून दर्जा दिला. त्यामुळे महाविद्यालयास सलग आठ वर्षे अग्रणी महाविद्यालय म्हणून चंदगड, आजरा व गडहिंग्लज या तीन तालुक्यातील एकूण बारा महाविद्यालयांचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. आजही आपले महाविद्यालय अग्रणी महाविद्यालय योजनेत समाविष्ट असून या योजनेअंतर्गत तीन तालुक्यातील विविध महाविद्यालयांमध्ये राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचा आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चांगला फायदा मिळत आहे.

आपल्या अंगीकृत कार्यास आपण सर्वांनी नव्या संकल्पासह, नव्या उत्साहाने, नव्या जिद्दीने या नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ करूया. श्री रवळनाथांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत.

माहिती तंत्रज्ञानाच्या व स्पर्धात्मक अशा नव्या युगात जागतिक स्तरावर उच्चशिक्षणात खूप वेगाने बदल होत आहेत. त्या सर्वांचा मुख्य रोख गुणवत्ता वृद्धीवर आहे. उच्च शिक्षणाची गुणवत्ता आणि त्या शिक्षणाचा प्रत्यक्षातील उपयोग यांवर सर्वांचे लक्ष केंद्रित झालेले आहे. म्हणूनच उच्च शिक्षणातील गुणवत्तेचे मूल्यमापन ही सर्व जगभर सुरू असलेली प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. या सर्वांचा विचार करता यापुढे महाविद्यालयांचे अस्तित्व केवळ त्यांच्या शिस्तबद्ध गुणवत्तेवरच अवलंबून राहणार आहे.

सर्व महाविद्यालयांमध्ये गुणवत्ता वृद्धीची स्पर्धा सुरू झालेली आहे. शासकीय व विद्यापीठ अनुदान आयोगाचे आर्थिक सहाय्यसुद्धा गुणवत्तेवरच अवलंबून आहे. त्यामुळे बदलत्या परिस्थितीत उच्च शिक्षण संस्थांच्या कार्यपद्धतीत खूप वेगाने बदल घडत आहेत.

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

आजरा महाविद्यालयामध्येसुद्धा जनता एज्युकेशन सोसायटीच्या दूरदर्शी आणि समर्थ मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सहकाऱ्यांच्या सहकार्याने अनेक नवे उपक्रम, नव्या व्यवस्था, नवीन कार्यपद्धती अमलात आणण्यात आल्या आहेत. त्यांचा तपशील या माहितीपत्रकात त्या त्या शीर्षकांखाली दिलेला आहे. या सर्वांची व्यवस्थित व पूर्णपणे माहिती आधी करून घ्यावी, जेणेकरून महाविद्यालयातील उपक्रम, व्यवस्था व कार्यपद्धतींची आपल्याला ओळख होईल.

प्राचार्य, डॉ. ए. एन. सादळे

## ८. महाविद्यालयाची काही ठळक वैशिष्ट्ये ( Some Important Features of the College)

### • गुणवत्ता वृद्धी (Quality Enhancement)

गुणवत्ता वृद्धी हा केवळ वरिष्ठ महाविद्यालयाचा विषय नसून त्यादृष्टीने संस्थेच्या बालवाडीपासूनच गुणवत्तावृद्धीचा व शिस्तीचा आग्रह व नियोजन असावे असा संस्थेचा कटाक्ष सुरुवातीपासूनच आहे. बालवाडीपासून पदवीपर्यंतचे शिक्षण एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचे संस्थेचे सुमारे ५० वर्षापूर्वीचे स्वप्न आज पूर्णपणे साकार झालेले आहे. आता गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण संस्था म्हणून आपला लौकिक वृद्धिंगत व्हावा, असाच आपणा सर्वांचा आग्रह आहे. त्यासाठी प्रसंगी व्यावहारिक तडजोड आणि बदलत्या काळानुरूप बदलण्याची मानसिकता आणि संस्थेच्या सर्व घटकांची साखळी पद्धतीने, सहकार्याने काम करण्याची तयारी यासारख्या गोष्टींची नितांत आवश्यकता आहे. हे सहकार्य आपण सिद्ध करू शकलो तर अपेक्षित यश कमी कालावधीत आपण प्राप्त करू शकू असा विश्वास आहे. महाविद्यालयाच्या सर्व शैक्षणिक कार्यक्रमांच्या गुणवत्ता हमी आणि गुणवत्ता वृद्धीची योजना आखणे, संबंधितांना मार्गदर्शन करणे व संनियंत्रण करणे आणि गुणवत्तावृद्धी उपाययोजनांसाठीच्या कामाचा पाठपुरावा करणे याकरिता महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी समिती (International Quality Assurance Committee) कार्यरत आहे. सदर समिती विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासन यांनी वेळोवेळी काढलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कार्य करते.

यापुढे उच्च शिक्षण अधिकाधिक 'स्वयंअभ्यास' या पद्धतीशी निगडित होत जाणार आहे. त्यासाठी प्रामुख्याने तीन साधनांचा सतत वाढता उपयोग करावा लागणार आहे. १) ग्रंथालय, २) संगणक, ३) इंटरनेट. या दृष्टीने महाविद्यालयाने नियोजन केलेले आहे. त्यासाठी सुसज्ज नवी विस्तृत अभ्यासिका पूर्ण केली असून त्यामध्ये शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच आधुनिक वातानुकुलित सुसज्ज संगणक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालय व बुकबँक या सुविधांचा अधिकाधिक व पूर्ण लाभ घ्यावा.

### • इंटरनेट व्यवस्था (Internet Facility )

यु. जी. सी. च्या सहकार्याने संगणकाबरोबरच स्वतंत्र इंटरनेटची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासासाठी त्याचा योग्य तो उपयोग करून प्रगती साधावी अशी अपेक्षा आहे. आमचे सर्व शिक्षक, कार्यालयीन सहकारी व प्राचार्य आपल्याला या संदर्भात योग्य ते मार्गदर्शन करतीलच.

सर्व विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा नव्या पद्धतीने उपयोग करून आपले अध्ययन परिपूर्ण करावे.

### • विभागीय ज्ञानस्रोत केंद्र (Departmental Knowledge Resource Centre)

महाविद्यालयाच्या प्रत्येक विभागात स्वतंत्र ग्रंथालयाची सोय आहे. संबंधित विभागातील शिक्षक व संबंधित विद्यार्थी यांनी परस्पर सहकार्याने या स्वतंत्र व्यवस्थेचा अधिकाधिक उपयोग करावा आणि स्वयंप्रयत्नातून अधिक समृद्ध व्हावे, अशी अपेक्षा आहे.

### • स्वतंत्र विभाग व्यवस्था (Departments)

वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान विभागात प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र सुसज्ज प्रयोगशाळा आहे. कला व वाणिज्य विभागांना स्वतंत्र खोलींची व्यवस्था केली आहे. विद्यार्थी व शिक्षकांनी गुणवत्ता वृद्धीसाठी एकत्र यावे, अभ्यासक्रमासाठी एकत्र विचार विनिमय करावा, विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन शांतपणे करता यावे, त्यांच्या अडीअडचणी त्यांना समजावण्यात व त्या दूर करण्यासाठी प्रयत्न करता यावेत. इत्यादी बहुविध उद्देशाने स्वतंत्र विभागांची व्यवस्था आहे. विषयांच्या विभागांप्रमाणेच विद्यार्थी ग्राहक भांडार, क्रीडा विभाग आणि विद्यार्थिनी यांचेसाठी ही स्वतंत्र व्यवस्था आहे. महाविद्यालयाच्या प्रशासनाच्या सोयीसाठी व एकूण प्रगतीसाठी चौपदरी प्रशासन (FOUR FOLD ADMINISTRATION) कार्यरत असून यामध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी समिती ( IQAC), परिसर विकास मंडळ (Campus Development and Maintenance), तक्रार निवारण समिती ( Grievance Redressal Cell), महाविद्यालय विकास समिती (College Development Committee), राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियान समिती (RUSA), वेळापत्रक व समायोजन समिती

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

(Time Table and Leave Adjustment)प्रवेश समिती (Admission Committee), महाविद्यालय विद्यार्थी परिषद (College Students Council), परीक्षा व मूल्यमापन मंडळ (Examination and Evaluation Committee), प्रत्याभरण समिती (Feedback Committee), विज्ञान व पर्यावरण दक्षता समिती (Science and Environment Forum), माजी विद्यार्थी संघ व जनसंपर्क समिती (Alumni Association and Public Relations), खरेदी समिती (Purchase Committee), इमारत व बांधकाम समिती (Building and Works Committee) इ. समित्यांचा समावेश आहे.

नवोपक्रमाच्या संकल्पनेचा प्रसार करण्यासाठी आणि ज्यामुळे अंतिमतः उपक्रम निर्मिती होते अशा नवसंशोधन प्रक्रियेद्वारे नवनवीन कल्पना, कार्यकारी प्रतिमांमध्ये पोषक वातावरण निर्मिती करण्याकरिता व ती रुजवण्याकरिता नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ (Board of Innovation, Incubation and Enterprise) स्थापन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी व प्रेरणा देण्यासाठी रामतीर्थ व भित्तिपत्रिका मंडळ (Ramteerth (House Organ) and Wallpaper Committee), वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समिती (Annual Social Gathering and Prize Distribution Committee), माहिती तंत्रज्ञान मंडळ (Board of Information Technology), अभ्यासपूरक उपक्रम मंडळे (Forum of Co-curricular Activities), ज्ञान स्रोत मंडळ (Knowledge Resource Committee), क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ (Sports and Physical Education Committee), कला व सांस्कृतिक मंडळ (Art and Cultural Committee), भाषा भगिनी मंडळ (Langauge Forum ), विद्यार्थी हजेरी व पालक संपर्क समिती (Students Attendance and Parent Communication Cell), शिष्यवृत्ती समिती (Scholarship Committee), संशोधन व सल्ला समिती (Research and Consultancy Cell), करिअर व रोजगार मार्गदर्शन समिती (Career Counseling and Employment Guidance Bureau Placement Cell), स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समिती (Competitive Examination Guidance Cell), राष्ट्रीय सेवा योजना(NSS), राष्ट्रीय छात्र सेना (NCC), कौशल्य शिक्षण (Skill / Career Oriented Courses), आदर्श विद्यार्थी (Ideal Student Award) निवड समिती इ. विभाग कार्यरत आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी व सुरक्षिततेसाठी विद्यार्थी विकास मंडळ (Student Development Committee), सचेतना मंडळ /महिला मंडळ (Sachetana Mandal/ Women Association), शिस्त, प्रार्थना व गणवेश समिती (Discipline, Prayer and Dress Code Committee), लैंगिक छळ प्रतिबंधक समिती (Sexual Harassment Prevention Committee), छळ प्रतिबंधक समिती (Anti Ragging Committee), समान संधी विभाग (Equal Opportunity Cell), इ. विभाग कार्यरत आहेत.

उच्च शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजातील विविध घटकांना महाविद्यालयात नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश न घेता दूर शिक्षणाच्या माध्यमातून उच्च शिक्षण घेणे शक्य व्हावे यासाठी महाविद्यालयातील दूर शिक्षण (Distance Education) विभाग कार्यरत आहे. याशिवाय विविध पदवीस्तरीय अभ्यासक्रम राबवून कौशल्यपूर्ण व विद्वत्तापूर्ण मनुष्यबळ तयार करण्यासाठी आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ (Board of Lifelong Learning and Extension) कार्यरत आहे. भविष्यकाळात या विभागांसाठी स्वतंत्र नव्या इमारतीचेही नियोजन करण्यात येत आहे. कॉलेज कॅन्टीनमध्येही विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था आहे.

## • रेमेडियल कोचिंग क्लासेस (Remedial Coaching Classes)

विद्यार्थी-विद्यार्थिनींना विशेष मार्गदर्शन करून त्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार विविध विषयांचे रेमेडियल कोचिंग क्लासेसचे वर्ग चालविले जातात. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन वर्गांचा लाभ घेऊन स्वतःची गुणवत्ता वाढवावी.

## • अंतर्गत परीक्षा पद्धती (Internal Examination )

अंतर्गत परीक्षा ही शैक्षणिक प्रक्रियेतील अत्यंत महत्वाची व्यवस्था आहे. नव्या पद्धतीत या परीक्षेचे परिपूर्ण स्वरूप लक्षात घेऊन गृहपाठ, चाचण्या, चर्चासत्रे, प्रकल्प-आयोजन, ग्रंथालयीन कार्य, वस्तुनिष्ठ प्रश्न, विवेचनात्मक उत्तरासाठीचे प्रश्न, वेगवेगळ्या प्रकारचे सर्वेक्षण, माहिती संकलन, त्या संकलनाचे अभ्यासपूर्ण निष्कर्ष, काही मर्यादित संशोधन इत्यादी विविध प्रकारांचा उपयोग करून अंतर्गत परीक्षा पद्धती आशयसंपन्न केली जाते. अंतर्गत परीक्षा व शैक्षणिक उपक्रमांत दुर्लक्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांवर योग्य ती कारवाई या विभागामार्फतच करण्यात येईल. या कारवाईचे स्वरूप पालकांना माहिती देणे इथपासून परीक्षा फॉर्म नाकारणे अगर भरलेला फॉर्म रद्द करणे इथपर्यंत असेल. गंभीर प्रकरणात प्रवेश रद्द करण्याची कारवाई होऊ शकेल, याची विद्यार्थ्यांनी गंभीर दखल घ्यावी.

## •ज्ञान स्रोत केंद्र (Knowledge Resource Centre)

शिक्षण व्यवस्थेमध्ये अध्यापनाबरोबर स्वयंअध्ययन हे महत्त्वाचे मानले आहे. ज्ञानवृद्धीसाठी उत्तम ग्रंथालय असणे आवश्यक आहे. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे असून या तंत्रज्ञानाचा झपाट्याने वापर होत आहे. ग्रंथालय व माहितीशास्त्र हे माहिती तंत्रज्ञानाच्या जवळचे क्षेत्र असल्याने जास्तीत जास्त प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वापर या क्षेत्रात होत आहे. परिणामी ग्रंथालय व माहितीशास्त्र क्षेत्राची प्रगतीही तितक्याच प्रचंड वेगाने होत आहे.

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

महाविद्यालयाच्या मा. जॉन अलेक्स फर्नांडिस ग्रंथालयात विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापकांच्यासाठी स्वतंत्र वाचन कक्ष आहेत. ग्रंथालयामध्ये निवडक ग्रंथसंग्रह, संदर्भग्रंथ, पुस्तक पेढी, देणगी ग्रंथ, सीनिअर व ज्युनिअर अशी एकूण ३०३४२ इतकी ग्रंथसंपदा आहे. यामध्ये मराठी विश्वकोश खंड १ ते १९, भारतीय संस्कृतीकोश खंड १ ते १०, एन्सायक्लोपीडिया ऑफ ब्रिटनिका खंड १ ते ३३, महाराष्ट्र १९८३ ते २०१९, इंडिया ए रेफरन्स अन्युअल २०१९, भारतीय शास्त्रज्ञ यांची चरित्रे, १००० वर्षातील १००० प्रभावशाली व्यक्तींचा शोध घेणारे 'यांनी घडविलेले सहस्त्रक', हिंदी व्युत्पतिकोश खंड क्र. ४, यशपाल रचनावली खंड १ ते १४, स्त्री साहित्याचा मागोवा खंड १ ते ३, संदर्भ महाराष्ट्र खंड १ ते ५, विज्ञानविषयक सर्व शब्दकोश (संस्कृत-मराठी, आदर्श मोल्सवर्थ कृत मराठी इंग्रजी, केंब्रिज, ऑक्सफर्ड, वेबस्टर, चाऊस डिक्शनरी), मराठी शब्दकोश खंड १ ते ५ व इतर ग्रंथांचा समावेश आहे. याशिवाय ६० नियतकालिके व ५ वृत्तपत्रे नियमित येतात. ६२९२ ई-जर्नल्स, व १३५८०९ ई- बुक्स उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या अडीअडचणी दूर करणे, त्यांना स्पर्धात्मक परीक्षेसाठी मार्गदर्शन करणे यासाठी ज्ञानस्रोत मंडळ/ग्रंथालय समिती कार्यरत आहे.

ग्रंथालयातील सर्व ग्रंथांचे संगणकीकरण पूर्ण झाले असून, आवश्यक त्या विषयातील उपलब्ध ग्रंथांच्या सूची संगणकाद्वारे उपलब्ध होत आहे. ग्रंथालय सकाळी ७ :३० ते दुपारी ४ :०० पर्यंत सलग सुरू असते. अभ्यासिका सकाळी ८:०० ते रात्री १२:०० पर्यंत चालू असते. ग्रंथालयासाठी स्वतंत्र संगणक व ग्रंथालय प्रणाली खरेदी केली आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक व अन्य महाविद्यालये यांना कोणालाही आपल्याकडील ग्रंथांची माहिती मिळणार आहे. याकरिता विद्यार्थ्यांना मोफत इंटरनेटची सोय देण्यात आली आहे.

आजचे युग हे संगणक युग आहे. जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात संगणकाने प्रवेश केला आहे. येत्या काही वर्षात संगणकाच्या वापरात मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. यास आमचे ग्रंथालय अपवाद नाही. माहिती शोध व प्रतीप्राप्ती प्रणालीसाठी संगणकाचा उपयोग करण्यात येत आहे. यासाठी इंटरनेट अंतर्गत सायबरस्पेस मल्टीमिडिया या तंत्राचा उपयोग करून अद्ययावत माहिती तंत्रज्ञान विकसित करण्याचा प्रयत्न आहे. इंटरनेटच्या माध्यमातून Online Opac ची सुविधा चालू करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रंथालयातील सर्व ग्रंथांची माहिती इंटरनेटवर उपलब्ध आहे.

विद्यार्थ्यांना पुस्तकांचा संच घरी वापरणेस मिळावा या हेतूने महाविद्यालयात सन २००६-२००७ पासून 'बुक बँक योजना' कार्यान्वित करण्यात आली आहे. याचा विद्यार्थ्यांनी योग्य लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांच्या लेखन कलेला प्रोत्साहन मिळावे म्हणून वर्षभरातील भित्तिपत्रिकामधील निवडक लेखांचे संकलन करून संदर्भ म्हणून ग्रंथालयात ठेवण्यात आले आहेत. तसेच सर्व ग्रंथ स्वतंत्र विभागात ठेवण्यात आले आहेत. कठीण परिस्थितीतही ग्रंथालय विकासाची प्रक्रिया नियोजनपूर्वक सातत्याने गतिमान करण्यात आली आहे.

- **दृक्-श्राव्य साधने विभाग (Department of Audio Visual Aids)**

आमच्या महाविद्यालयात दृक्-श्राव्य साधने विभाग स्वतंत्र इमारतीमध्ये सर्व साधनांसह कार्यरत आहे. सध्या या विभागात दूरचित्रवाणी, व्ही. सी. आर., ओव्हर हेड प्रोजेक्टर-२, एल. सी. डी. प्रोजेक्टर-४, डी. व्ही. डी. प्लेयर-२, स्लाईड प्रोजेक्टर, व्हिज्युअल प्रेजेंटर, कॅमेरा, दुर्बीण, टेपरेकॉर्डर व विविध विषयाकरच्या पंधरा व्हिडीओ कॅसेट व आठ ऑडिओ कॅसेट उपलब्ध आहेत. दैनंदिन अध्यापनाच्या कामात या सर्व दृक्-श्राव्य साधनांचा वेळोवेळी उपयोग केला जातो. अद्ययावत ध्वनी योजना, संगीत साहित्य इ. सोयीही उपलब्ध आहेत.

- **संगणक विभाग (Computer Department)**

विद्यार्थी-विद्यार्थिनींना संगणकाचे ज्ञान व्हावे, याकरिता महाविद्यालयात ९५ संगणक संच उपलब्ध आहेत. संगणकशास्त्र विभागात ६५ अत्याधुनिक संगणक आणि ५ प्रिंटर्स असून यासाठी दोन सुसज्ज प्रयोगशाळा आहेत. या विभागात डिजीटल कॅमेरा खरेदी केला असून महाविद्यालयातील कार्यक्रमांना प्रसिद्धी देण्यासाठी लागणारे फोटो व विद्यार्थ्यांची आयडेंटी कार्ड याच विभागातून दिली जातात. शिवाय या विभागात इंटरनेटची सोय विद्यार्थी व शिक्षकांना उपलब्ध करून दिली आहे. आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी या विभागातून विविध कोर्सेस यशस्वीरित्यापूर्ण केलेले आहेत. दर्जेदार शिक्षण व २४ तास विद्युत पुरवठ्याची सोय ही या विभागाची वैशिष्ट्ये आहेत.

- **३ प्रोजेक्टर रुम्स (3 Projector Rooms )**
- **२ एल. सी. डी. डिजीटल रुम्स (2 LCD Digital Rooms)**

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

### • सुसज्ज प्रयोगशाळा (Well Equipped Laboratories)

११ वी ते बी. एससी. पर्यंतचे विज्ञान शाखेचे शिक्षण या महाविद्यालयामध्ये उपलब्ध आहे. यासाठी सर्व विषयांच्या प्रयोगशाळा सुसज्ज अशा वैज्ञानिक उपकरणांनी आणि सर्व सुविधांनी परिपूर्ण आहेत. त्यामध्ये विज्ञानविषयक सामुग्री, वेगवेगळे फलक (चार्टस) आणि प्राणी व हर्बेरियम (संग्रह) याचा समावेश आहे.

### • विद्यार्थी सहकारी भांडार (Student's Co-operative Store)

महाविद्यालयात विद्यार्थी ग्राहक भांडाराची सोय आहे. यामध्ये स्टेशनरी व अन्य शैक्षणिक साहित्य सर्वांना योग्य दरात उपलब्ध करून दिले जाते. स्वतंत्र जागेत हे ग्राहक भांडार कार्यरत आहे.

### • महाविद्यालय विद्यार्थी परिषद (College Students Council)

महाविद्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९९(३) प्रमाणे महाविद्यालय विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यात येते. या विद्यार्थी परिषदेमध्ये महाविद्यालयात पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांमधून निवडून आलेले सभापती, सचिव, विद्यार्थिनी प्रतिनिधी व मागासवर्गीय विद्यार्थी प्रतिनिधी असे ४ सदस्य असतात आणि प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांमधून निवडून आलेला एक वर्गप्रतिनिधी असतो. याशिवाय प्राचार्यांनी नामनिर्देशित केलेला राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा आणि सांस्कृतिक विभाग यामधील प्रत्येकी एक विद्यार्थी/विद्यार्थिनीचा समावेश असतो. महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून नियुक्त केलेल्या विद्यार्थी परिषदेचा समन्वयक म्हणून एक वरिष्ठ अध्यापक आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी यांचा कायमस्वरूपी निमंत्रित सदस्य म्हणून समावेश असतो. कोणताही विद्यार्थी जर त्याची/तिची पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून महाविद्यालयात नाव नोंदणी झाली असेल तरच तो/ती महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचा सदस्य होण्यास पात्र असेल. महाविद्यालयात विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थी सदस्यांची निवडणूक ही प्रत्येक वर्षी शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर विद्यापीठाकडून विहित करण्यात येईल अशा दिनांकास घेण्यात येईल. निवडून आलेल्या विद्यार्थी सदस्यांचा पदावधी हा दरम्यानच्या कालावधीत महाविद्यालयात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निरर्हता त्यांनी आपल्यावर ओढवून घेतलेल्या नसतील तर निवडणुकीच्या दिनांकापासून सुरू होऊन शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या दिवसापर्यंत असेल, आणि त्यानंतर तो समाप्त होईल. महाविद्यालय विद्यार्थी परिषदेची बैठक दर तीन महिन्यातून किमान एकदा घेण्यात येईल. महाविद्यालय विद्यार्थी परिषदेच्या एक-तृतीयांश सदस्यांनी बैठकीची गुणपूर्ती होईल. बैठकीचे कामकाज चालविण्यासंबंधीची कार्यपद्धती आणि अशा इतर बाबी परिनियम विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. महाविद्यालय विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीच्या कालावधीमध्ये महाविद्यालयाच्या हजेरी पटावरील विद्यार्थी वगळता कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही नात्याने निवडणूक प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी देण्यात येणार नाही, या शर्तीचे उल्लंघन करणारा कोणताही विद्यार्थी किंवा उमेदवार हा, त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास त्याचबरोबर त्याची उमेदवारी रद्द केली जाण्यास पात्र असेल. महाविद्यालय विद्यार्थी परिषदेच्या कोणत्याही विद्यार्थी/विद्यार्थिनी सदस्यास राजकारणात भाग घेता येणार नाही. अन्यथा असा सदस्य त्याच्या/ तिच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास पात्र असेल.

### • क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग (Department of Sport and Physical Education)

या विभागातर्फे विविध खेळांचे प्रशिक्षण खेळाडूंना दिले जाते. विविध प्रकारच्या विविध स्तरांवरील क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थी /विद्यार्थिनींना शारीरिक शिक्षण परीक्षा द्यावी लागते. उत्तीर्ण होण्यासाठी व श्रेणीसाठी या गुणांचा त्यांना उपयोग होतो. जिम्नॅशियमची स्वतंत्र अद्ययावत व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा वापर विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त करावा. जिमखाना हॉल, क्रीडांगण आणि क्रीडा साहित्याची उत्तम सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### • राष्ट्रीय सेवा योजना (NSS)

महाविद्यालयात १०० विद्यार्थी-विद्यार्थिनींचे हे युनिट आहे. या योजनेमार्फत ५० स्वयंसेवकांचे ग्रामीण भागात ७ दिवसांचे श्रमसंस्कार शिबिर भरवण्यात येते. गुणवत्ता, समाजसेवेची आवड, नियमितता, आरक्षण या निकषांवर या योजनेत विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. या विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजसेवेची उत्कृष्ट संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या विभागातील स्वयंसेवकांनी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाविद्यालयाने महाराष्ट्र शासनाचा राज्यपुरस्कार मिळवून यशाची उज्ज्वल परंपरा निर्माण केली आहे.

ग्रामस्थांचे वैचारिक प्रबोधन, विविध प्रकारचे पाहणी कार्यक्रम (सर्वेक्षण), वृक्षारोपण, ग्रामसफाई, रस्तेदुरुस्ती, आरोग्य शिबिर, एड्स विषयक जनजागृती, पशुवैद्यकीय शिबिर, ग्रामीण भागात कायदेविषयक समाज सेवा अशा अनेक विधी प्रबोधन उपक्रमांतून विद्यार्थी-विद्यार्थिनींना समाजसेवेचे कार्य करण्याची संधी या विभागात उपलब्ध आहे. मडिलगे, हाळोली, येमकोंड, एरंडोळ,

चाफवडे, होनेवाडी, शिरसंगी, खेडे, मुम्देवाडी, देवर्डे, हरपवडे, बोलकेवाडी, हाजगोळी, किणे, सोहाळे, चित्रानगर इ. ठिकाणी आजपर्यंत या विभागाने श्रमसंस्कार शिबिरे घेऊन टिकाऊ स्वरूपाची कामे श्रमदानातून केलेली आहेत. शिवाजी विद्यापीठात एक कृतिशील एकक म्हणून आजरा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा लौकिक वृद्धिंगत झाला आहे. तो टिकवणे व वाढविणे ही आपली जबाबदारी आहे.

- **राष्ट्रीय छात्र सेना (NCC)**

राष्ट्रीय छात्र सेनेचे हे ३५ वे वर्ष! 'एकता व अनुशासन' हे घोषवाक्य असणाऱ्या या सेनापथकाने शिस्त, चारित्र्य, धैर्य, निरपेक्ष सेवा व पर्यावरणाबाबत प्रेम आणि जागरूकता या ध्येयाप्रत कार्य करून आपली उज्ज्वल परंपरा निर्माण केली आहे. यास अनुसरून या विभागात शिस्त, नम्रता व लष्करी शिक्षणाची आवड या निकषांवर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. राष्ट्रीय छात्र सेनेच्या सर्व परेडस् व कॅम्पसना कॅडेट्सनी हजर राहणे आवश्यक असते.

'बी','सी' सर्टिफिकेट परीक्षांचे अभिमानास्पद निकाल, रक्षामंत्री पदक, युद्धाची चित्तथरारक प्रात्यक्षिके, तीन सुवर्ण व एक ब्राँझ अशी राष्ट्रीय स्तरावरील पदके, मा. कुलगुरूंना देण्यात आलेल्या शिस्तबद्ध मानवंदना, ट्रेकिंग कॅम्प्स, आर्मी अॅटॅचमेंट कॅम्प्स, अनुअल ट्रेनिंग कॅम्प्स यातील स्पर्धांमधील नेत्रदीपक यश, उत्कृष्ट युनिट म्हणून ग्रुप कमांडिंग ऑफिसकडून अनेकदा गौरव, महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्र्यांची दोन कॅडेट्सना मिळालेली शिष्यवृत्ती अशा अभिमानास्पद कार्यातून गेल्या अनेक वर्षांमध्ये या विभागाने शिवाजी विद्यापीठात नावलौकिक प्राप्त केला आहे. या विभागामार्फत शासनाच्या विविध शिष्यवृत्ती दिल्या जातात. सन २००१ मध्ये २ कॅडेट्स दिल्ली येथील आर. डी. परेडसाठी सहभागी झाले होते.

सन २०२० मध्ये महाविद्यालयातील अंडर ऑफिसर राजवर्धन देसाई याने प्रजासत्ताकदिनी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींना 'गार्ड ऑफ ऑनर' देण्याचा मान मिळवून महाविद्यालयाचे नाव सर्वत्र झळकविले आहे.

- **सांस्कृतिक विभाग (Cultural Department)**

विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा यासाठी महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग कार्यरत आहे. या सांस्कृतिक विभागाच्यावतीने उपक्रम राबविले जातात. युवा महोत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीपर्यंत कला सादर करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे.

- **सेमिनार, परिसंवाद, चर्चासत्रे, अभ्यास सहली (Seminar, Conference, Workshops, Study Tours)**

महाविद्यालयात विविध भागांच्यामार्फत विद्यापीठ व यु. जी. सी. च्या सहकार्याने विविध विषयांवर सेमिनार, परिसंवाद, चर्चासत्रे आयोजित केली जातात. यामध्ये शिक्षक व विद्यार्थी उत्स्फूर्त सहभाग घेतात. विशिष्ट विषयावर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण चर्चा करावी असे प्रयत्न या माध्यमातून होतात. वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, औद्योगिक व्यवस्थापन, रसायनशास्त्र इ. विषयांसाठी अभ्यासांतर्गत एक भाग म्हणून शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते. विद्यार्थी यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होतात व सर्व कार्यक्रम शिस्तबद्धपणे पार पाडतात. अभ्यासक्रमासाठीच्या सहली व्यतिरिक्त इतर कोणत्याही सहलींना अनुमती देण्यात येत नाही.

- **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (Competitive Examination Guidance Cell)**

आमच्या महाविद्यालयात मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजन मंडळाच्या सहकार्याने शासनमान्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कार्यरत आहे. सदर विभागामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा पूर्वतयारीसाठी मार्गदर्शन केले जाते. सदर वर्गात एमपीएससीमधून पास झालेल्या व अधिकारी पदावर असणाऱ्या अनुभवी व्यक्तींची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली जातात. यासाठीचे उपयुक्त ग्रंथ या विभागात उपलब्ध आहेत. तसेच एमपीएसी, युपीएससी यासारख्या परीक्षेच्या पूर्वतयारीबाबतचे मार्गदर्शन सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींना उपलब्ध करून दिले जाते.

- **करिअर व रोजगार मार्गदर्शन विभाग (Career Counseling and Employment Guidance Cell)**

या विभागामार्फत करिअर आणि नोकरभरतीच्या संधी याची माहिती वेळोवेळी विद्यार्थ्यांना दिली जाते. महाविद्यालयात नामांकित कंपन्यांमध्ये नोकरभरतीसाठी कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले जाते. यासाठी स्वतंत्र 'प्लेसमेंट सेल' विभागात कार्यरत आहे. याचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना झाला आहे.

- **अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम विभाग (Department of Co-curricular and Extracurricular Activities)**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध गुणांचा विकास व्हावा म्हणून महाविद्यालयात शैक्षणिक स्पर्धा विभाग चालू आहे. या विभागामार्फत विद्यार्थ्यांची वक्तृत्व, काव्यवाचन, निबंध लेखन, युवक महोत्सवासाठी असणाऱ्या वेगवेगळ्या स्पर्धा, इत्यादींसाठी तयारी करून घेतली जाते व वेगवेगळ्या ठिकाणी होणाऱ्या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना पाठविण्यात येते. तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, सराव आणि ग्रंथालयाची मदत याद्वारे विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये भाग घेऊन गुणवत्ता सिद्ध करावी अशी अपेक्षा आहे.

मागील अनेक वर्षांपासून या विभागाने उत्तम कामगिरी करून वक्तृत्व स्पर्धांमध्ये आपला उत्तम नावलौकिक प्राप्त केला आहे.

**• आदर्श विद्यार्थी निवड योजना (Ideal Student Scheme)**

सन २००६-०७ या महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षापासून आदर्श विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवड करण्याची योजना कार्यरत झाली आहे. महाविद्यालयाच्या पदवी परीक्षेच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थी-विद्यार्थिनींमधून एक विद्यार्थी व एका विद्यार्थिनींची निवड गुणानुक्रमे केली जाते. या संदर्भातील निकषांबाबतची प्रश्नावली इच्छुक विद्यार्थ्यांनी भरून द्यावी लागते. सोबत गुणदान पद्धतीची माहिती देण्यात येते.

**• वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण (Annual Social Gathering and Prize Distribution)**

दरवर्षी स्नेहसंमेलन शिस्तबद्धरीतीने साजरे केले जाते. वर्ग प्रतिनिधींच्या बैठका घेऊन कार्यक्रमाची आखणी केली जाते. यावेळी कार्यक्रमाचा दर्जा शैक्षणिक मूल्ये याकडे कटाक्षाने लक्ष देण्यात येते. सर्व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग व शिस्तबद्ध वर्तन यामुळे हा कार्यक्रम अगदी स्नेहपूर्ण वातावरणात पार पडतो. ही एक चांगली परंपरा महाविद्यालयात राखली गेली आहे. यासंदर्भात वेळोवेळी केलेले नियम विद्यार्थ्यांच्यावर बंधनकारक असतात. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला/नवनिर्मितीला विधायक व शिस्तबद्धतेच्या दृष्टीने या विभागात वाव दिला जातो. महाविद्यालयातील गुणवंत व यशवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा गौरव करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पारितोषिक वितरणाचा स्वतंत्र समारंभ आयोजित केला जातो. काही बक्षिसे प्रसंगपरत्वे दिली जातात.

**• रामतीर्थ (Ramteerth- House Organ)**

विद्यार्थ्यांच्या लेखन व कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच महाविद्यालयातील वर्षभरातील अनेक उपक्रम, योजना इत्यादींची तपशीलवार माहिती एकत्रित करण्यासाठी दरवर्षी 'रामतीर्थ' हे वार्षिक नियतकालिक प्रसिद्ध केले जाते. शिवाजी विद्यापीठाने यातील लेखकांना पुढीलप्रमाणे एकूण ७३ बक्षिसे ठेवलेली आहेत. शिवाजी विद्यापीठ वार्षिक नियतकालिक स्पर्धा दरवर्षी होत असते. त्यासाठी, मराठी, हिंदी व इंग्रजी विभागासाठी प्रत्येकी १८ बक्षिसे ठेवलेली आहेत.

• वैयक्तिक निबंध-तीन बक्षिसे • लघुकथा- तीन बक्षिसे • कविता -तीन बक्षिसे • एकांकिका -तीन बक्षिसे
•प्रवासवर्णन- तीन बक्षिसे •ग्रामीण -आदिवासी- विनोदी कथा-तीन बक्षिसे •माहितीपूर्ण लेखासाठी -तीन बक्षिसे

**कलात्मकतेसाठी**

• कार्टून -तीन बक्षिसे • फोटोग्राफी-तीन बक्षिसे • पेंटिंग -तीन बक्षिसे • संस्कृत, कन्नड भाषेसाठी एक बक्षीस
• रेखाचित्र -तीन बक्षिसे •सर्व बाबतीत प्रथम येणाऱ्या अंकाला तीन ट्रॉफीज अशी एकूण ७३ बक्षिसे आहेत.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत सर्वोत्कृष्ट अंकाला तीन पारितोषिके दिली जातात. आपल्या रामतीर्थ अंकातील लेखनास अनेकवेळा पारितोषिके मिळाली आहेत.

शिक्षकांच्या मार्गदर्शनाने वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी ही पारितोषिके मिळवावीत असा प्रयत्न असतो.

**• भित्तिपत्रक विभाग (Department of Wall Paper)**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी आणि विविध विषयांवर माहिती संकलित करून विद्यार्थ्यांच्या निदर्शनाला आणण्यासाठी स्वातंत्र्य दिन, स्नेह संमेलन आणि प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून 'नवपल्लव', 'आशय' व 'विज्ञानविश्व' अशी तीन भित्तिपत्रके प्रदर्शित केली जातात. या विभागाचा सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींनी लाभ घ्यावा.

**• प्रार्थना (Prayer)**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम व देशप्रेम, देशाभिमान वृद्धिंगत व्हावा, तसेच विद्यार्थ्यांमधील चिंतनशीलता वाढीस लागावी म्हणून दर गुरुवारी प्रार्थना (राष्ट्रगीत) आयोजित केली जाते. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक एखाद्या विषयावर ५ मिनिटांचे 'चिंतन' सादर करतात. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी एकत्रित उपस्थित राहत असल्याने यावेळी समाहातील विविध उपक्रमांत प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले जाते. महाविद्यालयीन कामकाजाच्या संदर्भात महत्त्वाच्या सूचना सांगितल्या जातात. अशा रीतीने महाविद्यालयाचे सर्व घटक एकत्र येण्याचा 'प्रार्थना' हा उपक्रम महाविद्यालयाच्या सुरुवातीपासून चालू आहे. हा उपक्रम आपल्या महाविद्यालयाचे खास वैशिष्ट्य आहे. सर्व विद्यार्थ्यांनी यामध्ये उपस्थित राहणे आवश्यक व बंधनकारक आहे. सुसंस्कारित भावी नागरिक घडविणे हे ध्येय असल्याने ज्ञान, संस्कार व शिस्त यांचा या महाविद्यालयात प्रथमपासून आग्रह धरण्यात आला आहे. या संदर्भातील नियमांचे व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक व बंधनकारक आहे. प्रार्थनेवेळी ड्रेसकोड परिधान करणे आवश्यक आहे.

**• सूचना पेटी (Suggestion Box)**

विद्यार्थी, विद्यार्थिनींना त्यांच्या शैक्षणिक सूचना मांडण्यासाठी ग्रंथालयात सूचना पेटी ठेवली आहे. ही सूचना पेटी महिन्यातून एकदा उघडली जाते व योग्य सूचनांची दखल घेतली जाते.

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

- **सुविधा (Facilities)**

घरगुती विद्युत उपकरणांच्या दुरुस्तीचा अभ्यासक्रम कनिष्ठ विभागात सुरू असून त्यातील कार्यशाळेत घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती करून दिली जाते. विद्यार्थी-पालक, सर्व नागरिक यांना या सोयींचा लाभ घेता येतो. तसेच विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी झेरॉक्स मशीन, संगणक, इंटरनेट, स्वच्छ व शुद्ध पाण्यासाठी अॅक्वागार्डसह कुलर्सची सोय, उपाहारगृह इ. महत्त्वाच्या सोयी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. अखंडित वीज पुरवठ्यासाठी जनरेटर्सची सोयदेखील आहे.

- **पदव्युत्तर विभाग (P. G. Department)**

परिसरातील विद्यार्थी-विद्यार्थिनींची पदव्युत्तर शिक्षणाची गैरसोय दूर व्हावी या हेतूने सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात पदव्युत्तर विभाग सुरू करण्यात आला आहे. या विभागांमध्ये एम. ए. (अर्थशास्त्र) व एम. कॉम. (अकाऊंन्टसी) चे नियमित वर्ग सुरू आहेत. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या संधीचा लाभ घ्यावा.

- **दूर शिक्षण केंद्र (Distance Education Centre)**

सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून शिवाजी विद्यापीठाने बहि:स्थ विभाग बंद केला आहे. त्यामुळे बहि:स्थ विद्यार्थ्यांना आता 'दूर शिक्षन केंद्र' या विभागामार्फत प्रवेश घ्यावा लागणार आहे. आपल्या महाविद्यालयात 'दूर शिक्षण केंद्र' हा विभाग स्वतंत्रपणे कार्यरत आहे. त्यामार्फत खालील सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

१) बहि:स्थ विद्यार्थ्यांना प्रवेश देणे

२) सर्व विषयांचे वाचन साहित्य (SIM) पुस्तकांचे वितरण करणे.

३) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन (Counseling) वर्षातून दोन दिवस सर्व विषयासाठी समुपदेशनासाठी कार्यशाळा आयोजित केली जाईल. बहि:स्थ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील या विभागाशी संपर्क साधावा.

- **उपाहारगृह (Canteen)**

ग्रामीण भागातील अनेक गावातून विद्यार्थी-विद्यार्थिनी महाविद्यालयात येतात. महाविद्यालयाच्या परिसरात अशा विद्यार्थ्यांसाठी जेवण करणे (स्वत:चे डबे) किंवा चहा, अल्पोपहार घेणे यासाठी उपाहारगृहाची सुविधा उपलब्ध केलेली आहे. विद्यार्थ्यांनी या सुविधांचा योग्य प्रकारे वापर करण्याचा आहे. तंबाखू, गुटखा खाणे असे गैरवर्तन या ठिकाणी करू नये. येथे वाढदिवस साजरे करू नयेत. तसेच उपाहारगृहामध्ये कार्बोनेट शीतपेय, जंकफूड तसेच तंबाखुयुक्त पदार्थ यांची विक्री करण्यास मनाई आहे.

- **मुलींचे वसतिगृह (Ladies Hostel)**

४८ मुलींच्यासाठी अद्ययावत वसतिगृह उपलब्ध आहे.

- **विद्यार्थी हजेरी व पालक संपर्क विभाग (Students Attendance and Parent Communication Cell)**

विद्यार्थ्यांची गैरहजेरी, वर्तनातील बेशिस्तपणा, परीक्षेतील चुकारपणा व अवनती याबद्दल पालकांना वेळोवेळी कळविण्यात येते. संबंधित विद्यार्थ्यांनी व पालकांनी प्राचार्यांना प्रत्यक्ष भेटून खुलासा करावा लागतो. विद्यार्थ्यास त्याच्या अभ्यासात ज्या अडचणी येतील त्याची पालकांनी खुल्या मनाने प्राचार्यांशी चर्चा करावी. शासकीय नियमानुसार उपस्थिती नसल्यास प्रवेश रद्द केला जाईल व परीक्षेस बसता येणार नाही. यासाठी आपल्या पाल्याबाबत पालकांनी जागरूक राहणे आवश्यक आहे.

- **माजी विद्यार्थी संघ व जनसंपर्क विभाग (Alumni Association and Public Relation Department)**

महाविद्यालयाशी माजी विद्यार्थ्यांचे जिव्हाळ्याचे नाते राहावे, महाविद्यालयाकडून माजी विद्यार्थ्यांना कायम मार्गदर्शन मिळावे आणि महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन व योगदान मिळावे या हेतूने महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघ व जनसंपर्क विभाग कार्यरत आहे.

- **विद्यार्थी विकास विभाग (Student Development Cell)**

विद्यार्थ्यांची आवड-निवड व अडीअडचणी समजावून घेऊन त्यांना प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करणे आणि त्यांच्या प्रगतीचा आढावा घेऊन शिक्षण प्रक्रियेतला त्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देऊन प्रगतीपथावर नेण्याच्या हेतूने महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभाग कार्यरत आहे.

- **झेरॉक्स सेवा (Xerox Service)**

विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या सोयीसाठी महाविद्यालयात झेरॉक्सची सोय आहे.

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

## • शिस्त विषयक नियम (Rules Regarding Discipline)

प्रत्येक विद्यार्थ्यांची कॉलेजमधील उपस्थिती समाधानकारक असली पाहिजे. तसेच गृहपाठलेखन, परीक्षा फी देण्यातील वक्तशीरपणा याबाबतीत विद्यार्थ्यांनी दक्ष राहिले पाहिजे. महाविद्यालयाचे सर्व नियम कटाक्षाने पाळले पाहिजेत. विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या आवारातील वर्तन व पोषाख कोणत्याही प्रकारे आक्षेपार्ह असू नये. रिट पिटीशन क्र.६५६ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये रॅगिंग या स्वरूपाच्या घडणाऱ्या प्रकारांना फौजदारी गुन्हा समजलेला आहे. त्यामुळे अशा रॅगिंग घटनेबाबत संबंधित विद्यार्थी-विद्यार्थिनींची प्राथमिक चौकशी करून फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा अधिकार महाविद्यालयास आहे. याची विद्यार्थ्यांनी गंभीरपणे दखल घ्यावी. आमच्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्गात रॅगिंग संदर्भातील कोणतीही घटना घडलेली नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये महाविद्यालयात प्रवेश घेताना प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनीने अँटी रॅगिंग प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. शिस्तीचा एक भाग म्हणून संस्थेने व महाविद्यालयाने धोरणात्मक निर्णय घेऊन ड्रेस कोड अनिवार्य केला आहे. महाविद्यालयांनी ठरवून दिलेला ड्रेस कोड स्वतःहून शिवून घेण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थी-विद्यार्थिनींना राहील. मात्र धर्म, जात, पंथ व लिंग इत्यादी कारणावरून ड्रेसकोडमध्ये सवलत मागता येणार नाही. तसेच संस्थेने/महाविद्यालयाने परिस्थितीनुरूप केलेल्या शिस्तविषयक नियमांचा भंग करता येणार नाही. शिस्तविषयक नियमांचे काटेकोर पालन करणे सर्वांना बंधनकारक राहील. यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम कलम,२०१६ कलम १२७ (७) नुसार शिस्तपालन बाबत प्रवेश घेताना हमीपत्र देणे अनिवार्य राहील.

बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी. भाग-१ च्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसांत नवीन ओळखपत्र घेणे बंधनकारक आहे. बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी. भाग-२ च्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसांत आपल्या ओळखपत्राचे नूतनीकरण करून घेणे बंधनकारक आहे. महाविद्यालयाच्या प्रांगणात वावरताना प्रत्येक विद्यार्थ्याने सर्वांना दिसेल असे ओळखपत्र लावले पाहिजे. त्यावर त्याची स्वतःची स्वाक्षरी असली पाहिजे. महाविद्यालयातील संबंधित अधिकारी अथवा शिक्षकांनी किंवा प्रशासकीय कर्मचारी यांनी ते मागितल्यास त्यांना ते त्वरित देणे आवश्यक आहे. बेशिस्त गैरवर्तनाचे वेळी हे ओळखपत्र काढून घेण्याचा त्यांना अधिकार आहे. विद्यार्थी/विद्यार्थिनींचे गैरवर्तन शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहील. त्यासंदर्भात प्राचार्यांचा निर्णय अंतिम व संबंधितांवर बंधनकारक राहील.

महाविद्यालयाच्या ग्रंथालयात, प्रयोगशाळा, सभागृह, वर्गात, कार्यालयात, परीक्षागृहात व प्राचार्य कक्षात मोबाईल वापरास बंदी आहे. अशा ठिकाणी मोबाईल वाजल्यास मोबाईल हँडसेट जप्त केला जाईल. जप्त केलेला हँडसेट परत दिला जाणार नाही.

विद्यार्थ्यांनी नेहमी सूचना फलक पाहणे आवश्यक असून दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. अन्यथा होणाऱ्या परिणामास/ नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२७ (३ व ६) अन्वये शिस्तीचे पालन करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्याला प्रवेश नाकारण्याचा किंवा दिलेला प्रवेश रद्द करण्याचा अधिकार महाविद्यालयास आहे.

**महाविद्यालयाच्या परिसरात वाढदिवस व तत्सम कार्यक्रम घेण्यास मनाई आहे.**

## • शिस्तविषयक परिपत्रक, दंडक व अधिनियम (Govt. Circular, Universities Ordinance and Court Order Regarding Discipline)

### अ) उपस्थितीबाबत महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक

ई.बी.सी. व इतर सवलती मिळणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची ७५ टक्के उपस्थिती भरणे आवश्यक आहे. ती कमी पडल्यास मिळणाऱ्या सवलती व शिष्यवृत्ती रद्द होतील. शिवाय अशा विद्यार्थ्यांस, विद्यार्थिनीस शासन परिपत्रक क्रमांक ३३९३ (७४९८) तं.शि.०१ मंत्रालय मुंबई दि. १७/०७/१९९६ नुसार शिवाजी विद्यापीठ परीक्षेस बसण्यास अपात्र ठरवले जाईल.

### ब) शिवाजी विद्यापीठाचा गैरव्यवहाराबाबत अधिनियम

महाराष्ट्र शासन राजपत्र १४ ऑक्टोबर, १९८२ अन्वये विद्यापीठ परीक्षेच्या वेळी कॉपी, गुंडगिरी यासारखे गैरव्यवहार करणे सक्त मनाई आहे. (शि.वि.पत्र.क्र.परीक्षा प्रमाद/१६ दिनांक-१० मार्च, २००३) विद्यार्थी-विद्यार्थिनी विद्यापीठ परीक्षेच्या वेळी कॉपी, गुंडगिरी यासारखे गैरव्यवहार करत असेल अगर त्यात भाग घेत असेल अथवा त्यास अपप्रेरणा देत असेल किंवा त्याचा प्रचार करीत असेल तर अशा विद्यार्थ्यांविरुद्ध फिर्याद दाखल करण्यात येईल. अपराध सिद्ध झाल्यानंतर असा विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी सहा महिनेपर्यंत कारावासाची शिक्षा किंवा दंड रुपये पाचशे किंवा दोन्ही शिक्षा होण्यास पात्र असेल.

### क) रॅगिंग संदर्भातील नियम (Rules Regarding Ragging)

दिनांक - ३१ मे, १९९९ रोजी माननीय राज्यपाल महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग करण्यास मनाई

करणारा अधिनियम मंजूर केला असून त्यानुसार कोणत्याही विद्यार्थ्यास/विद्यार्थिनीस महाविद्यालयात किंवा महाविद्यालयाबाहेर रॅगिंग करण्यास सक्त मनाई आहे. जो विद्यार्थी-विद्यार्थिनी महाविद्यालयात किंवा महाविद्यालयाबाहेर, प्रत्यक्षकिंवा अप्रत्यक्षरित्या रॅगिंग करत असेल अगर त्यात भाग घेत असेल अथवा त्यास अपप्रेरणा देत असेलकिंवा त्याचा अपप्रचार करीत असेल तर अपराध सिद्ध झाल्यानंतर दोन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा आणि दंड रुपये दहा हजार इतक्या द्रव्य दंडाची देखील शिक्षा होण्यास तो/ती पात्र असेल.

**ड) लैंगिक छळ प्रतिबंधक अधिनियम (Rule Regarding Prevention of Sexual Harassment)**

मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या निवाड्याच्या आधारे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या अधिकार मंडळाने मान्य केलेल्या नियमावली अन्वये (पत्र. क्र. संलग्नता/टी-२/२९९ दिनांक २९/०९/२००१) कोणत्याही विद्यार्थ्यास अगर विद्यार्थिनीस महाविद्यालयात किंवा महाविद्यालयाबाहेर विनयभंग, लैंगिक छळ करण्यास सक्त मनाई आहे. जो विद्यार्थी-विद्यार्थिनी महाविद्यालयात किंवा महाविद्यालयाबाहेर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या लैंगिक छळ करत असेल अगर त्यात भाग घेत असेल अथवा त्यास अपप्रेरणा देत असेल किंवा त्याचा अपप्रचार करीत असेल तर अशा विद्यार्थ्यास महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल आणि विद्यापीठ परीक्षेत तीन वर्षेपर्यंत बसण्यास बंदी असेल. शिवाय अशा विद्यार्थ्याविरुद्ध पोलिसात फिर्याद दाखल करण्यात येईल आणि अपराध सिद्ध झालेनंतर असा विद्यार्थी,विद्यार्थिनी इंडियन पिनल कोडकिंवा तत्सम कायद्यातील तरतुदीनुसार होणाऱ्या शिक्षेस पात्र राहतील.

**इ) तंबाखू/ गुटखा सेवन व धूम्रपान बंदी आदेश** (Rules Regarding Prohibition of Consumption of Tobacco and Gutkha and Prohibition of Smoking)

मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्याकडील रि. पी. सिव्हील नंबर १३६/१९९९ मधील हुकूम महाराष्ट्र शासनाचे दिनांक २४/१२/२००२ चे परिपत्रक आणि मा. शिक्षण संचालक (उ. शि) पुणे यांचे पत्र क्र. ३२८२७/पी. आर./यु. एन. व्ही./१ दिनांक ३१/०३/२००३ अन्वये महाविद्यालयात आणि महाविद्यालयापासून १०० मीटर पर्यंतच्या परिसरात तंबाखू, गुटखा सेवन करण्यास अथवा धूम्रपान करण्यास किंवा अशा प्रकारच्या पदार्थांचा साठा करण्यास, प्रदर्शन भरविण्यास सक्त मनाई आहे. जो विद्यार्थी-विद्यार्थिनी अशा पदार्थांचे सेवन/धूम्रपान करत असेल किंवा साठा अगर प्रचार करीत असेल तर अशा विद्यार्थी-विद्यार्थिनीस महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.

- **शिष्यवृत्त्या (Scholarships)**

१) ग्रामीण भागातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती.
२) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती
३) प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या मुलांसाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती.
४) माध्यमिक शालान्त परीक्षेतर हिंदी अभ्यासाची शिष्यवृत्ती.
५) वर्गीकृत जाती-जमातींना व इतरांना मिळणाऱ्या शिष्यवृत्त्या.
६) अपंग विद्यार्थ्यांना खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.
७) राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती
८) शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती
९) राष्ट्रीय छात्रसेना शिष्यवृत्ती (N.C.C)
१०) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती
११) पंजाबराव देशमुख शिष्यवृत्ती

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीचा तपशील थोडक्यात पुढील प्रमाणे आहे. कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिक शास्त्र, अभियांत्रिकी, वैद्यकीय, आयुर्वेदिक व होमिओपॅथी, विधी, शिक्षणशास्त्र आणि ललित कला या विद्याशाखेतील, मागील परीक्षेत किमान ६० टक्के गुण असलेले विद्यार्थी अर्ज करू शकतील. **प्रत्येक वर्षी दि. ३१ सप्टेंबरपूर्वी विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह प्राचार्यांचेमार्फत अर्ज पाठवायचे असतात.**

या गुणवत्ता शिष्यवृत्त्या दोन प्रकारच्या आहेत. १) दरमहा रु.१०००/- प्रमाणे एक वर्षासाठी २) दरमहा रु.५००/- प्रमाणे एक वर्षासाठी. शिष्यवृत्तीचा कालावधी शैक्षणिक वर्षासाठी असतो. शिष्यवृत्ती दर ४०० विद्यार्थ्यांमागे एक या प्रमाणात दिली जात असल्यामुळे प्रत्येक वर्षी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्त्यांची संख्या परीक्षेत बसलेल्या त्या वर्षीच्या एकूण विद्यार्थी संख्येवर अवलंबून असते. प्रत्येक विद्याशाखा किंवा विषयातील एकूण शिष्यवृत्त्यांपैकी १० टक्के शिष्यवृत्ती सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवलेल्या आहेत. शिष्यवृत्तीची रक्कम दोन हप्त्यात दिली जाते. **प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेत असतानाच या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावा.**

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शासनाकडून शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती खालीलप्रमाणे देय राहील.

| उत्पन्न मर्यादा | शुल्क प्रकार | अभ्यासक्रम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय | अशासकीय अनुदानित | अशंत:/ टप्पा अनुदानित | कायम विनाअनुदानित |
| व्यावसायिक अभ्यासक्रम | | | | | |
| रु. २.५० लाखांपर्यंत | शिक्षण शुल्क | १०० % | १०० % | ५० % | ५० % |
| रु. २.५० लाख ते रु. ८.०० लाखांपर्यंत | शिक्षण शुल्क | १०० % | १०० % | ५० % | ५० % |
| व्यावसायिक अभ्यासक्रम | | | | | |
| रु. ८.०० लाखांपर्यंत | शिक्षण शुल्क | १०० % | १०० % | १०० % | १०० % |

**टीप :-** सदर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणेसाठी विद्यार्थ्यांनी स्वत: वेळेत ऑनलाईन फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून ऑनलाईन फॉर्मसोबत जोडणे गरजेचे आहे आणि ऑनलाईन फॉर्मची हार्ड कॉपी व आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती कार्यालयात संबंधित लिपिकांकडे जमा करणे बंधनकारक आहे.

**आवश्यक कागदपत्र :-** १) महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
२) पालकांना दोनपेक्षा जास्त अपत्ये नसल्याचे प्रमाणपत्र
३) तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले पालकांच्या (आई-वडिलांच्या एकत्र) उत्पन्नाचे प्रमाणपत्र

### मदत कक्ष

| अ.क्र. | तपशील | नाव | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी विद्यार्थ्यांना सहाय्य करणे | श्री. संदीप देसाई | ८८०५४८१४००<br>७५८८९१३१७६ |
| २. | ऑनलाईन भरलेले फॉर्म तपासणे व रेकॉर्ड ठेवणे | वरिष्ठ विभाग : श्री. भरत सुर्यवंशी<br>कनिष्ठ विभाग : श्री पी. बी. कोळी<br>व्होकेशनल विभाग : श्री. एस. पी. कांबळे | ९९२२३१३९८४<br>७५८८४६१६६१<br>९५६१७३१६९३ |
| ३. | देखरेख ठेवणे, वेळोवेळी आढावा घेणे व अहवाल देणे | वरिष्ठ विभाग : श्री. आर. एस. कर्पे<br>कनिष्ठ विभाग: श्री. डी. पी. संकपाळ<br>व्होकेशनल विभाग : श्री. एम. एच. देसाई | ९४२३२७९५७९<br>९५७९६६०२४८<br>९५६१७२५८५८ |

### समुपदेशन कक्ष

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसंदर्भात विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निराकरण आणि शंका समाधान करणेसाठी खालीलप्रमाणे महाविद्यालयात समुपदेशन कक्ष स्थापना करणेत येत आहे.

| अ.क्र. | तपशील | | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. | डॉ. अनिल देशपांडे (मुख्य कार्यकारी अधिकारी, जनता एज्युकेशन सोसायटी आजरा) | अध्यक्ष | (०२३२३)२४६१६२, ९४२३२८७४०२ |
| २. | श्री. रमेश गुरुलिंग कुरुणकर (सचिव, जनता एज्युकेशन सोसायटी आजरा) | उपाध्यक्ष | ७५८८६२०५२९ , ८३८००६६९४२ |
| ३. | श्री. बी. एस. कडवाले (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य, विज्ञान शाखा | ७५८८२५०९५५ |
| ४. | डॉ. ए. व्ही. बाबूळकर (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य, कला शाखा | ९४२३३११५७९ |
| ५. | डॉ. एस. के. चव्हाण (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य, वाणिज्य शाखा | ९४२००८११९४ |

आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.

## ९. विद्याशाखा वर्ग व विषय (Faculties, Courses and Subjects)

टीप :- सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून B.A., B.Sc. व B.Com., भाग-१ या वर्गांसाठी अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती NEP-2020 प्रमाणे सुरू झालेली असून यावर्षापासून B.A.,B.Sc. व B.Com., भाग-२ या वर्गांसाठी लागू होत आहे. पदवी तृतीय वर्षासाठी पाठ्यक्रम निवडताना 'पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (Choice Based Credit System)' नुसार पाठ्यक्रम निवडणे आवश्यक आहे. CBCS या पद्धतीन्वये परिनियमांमध्ये विहित केलेले श्रेयांक संचित करण्यासाठी विद्यार्थ्यांना बहुविध आंतरविद्याशाखीय मुख्य, ऐच्छिक किंवा दुय्यम किंवा सुलभ कौशल्य अभ्यास या पाठ्यक्रमांमधून पसंतीनुसार अभ्यासक्रमाची निवड करता येईल.

### विज्ञान शाखा (B.Sc.)

**प्रथम वर्ष –विज्ञान (B. Sc. I)**

अ) आवश्यक विषय :
१) इंग्रजी (English) २) भौतिकशास्त्र (Physics)
३) शारीरिक शिक्षण (P.E.) ४) लोकशाही निवडणूक आणि सुशासन
५) भारतीय राज्य घटना आणि स्थानिक स्वयंम सरकार

ब) ऐच्छिक विषय : **खालीलपैकी प्रत्येक गटातील कोणताही एक विषय निवडावा.**
गट-१ : रसायनशास्त्र (Chemistry)/ संगणकशास्त्र (Computer Science)
गट-२ : गणित (Mathematics)/ वनस्पतिशास्त्र (Botany)
गट-३ : संख्याशास्त्र (Statistics) / प्राणिशास्त्र (Zoology)

टीप : १)वेळापत्रकाच्या सोयीसाठी विषय गट वाढविण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार महाविद्यालयास राहील.
२)शारीरिक शिक्षण (P.E.) हा १० गुणांचा सक्तीचा विषय असेल.
३) इंग्रजी खेरीज इतर चार विषयांचे प्रत्येकी दोन पेपर असतील.
४) विद्यापीठाच्या आदेशाप्रमाणे विषय/अभ्यासक्रमांमध्ये बदल होऊ शकतो.
५) अर्जासोबत कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
६)महाविद्यालयाकडून किंवा विद्यापीठाकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व विषय गटांना मिळून एकूण १२० विद्यार्थ्यांना गुणवत्ता व आरक्षण विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.
७) प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक १२ वी च्या निकालारोजी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. (मुदतीनंतर आलेले प्रवेश अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.)
८) मुदतीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास इतर ठिकाणी प्रवेश मिळाल्यास आमच्याकडील प्रवेश रद्द करून आपली मूळ कागदपत्रे परत नेता येतील.

**द्वितीय वर्ष विज्ञान(B. Sc. II)**

अ) आवश्यक विषय : १) पर्यावरण अभ्यास (प्रकल्प अहवालासह) (Environmental Studies)

ब) ऐच्छिक विषय : **खालीलपैकी कोणताही एक विषय गट निवडावा.**
१) रसायनशास्त्र (Chemistry), गणित (Mathematics), संख्याशास्त्र (Statistics)
२) संगणकशास्त्र (Computer Science), गणित (Mathematics), संख्याशास्त्र (Statistics)
३) रसायनशास्त्र (Chemistry), भौतिकशास्त्र (Physics), संख्याशास्त्र (Statistics)
४) संगणकशास्त्र (Computer Science), भौतिकशास्त्र (Physics), संख्याशास्त्र (Statistics)
५) रसायनशास्त्र (Chemistry), वनस्पतिशास्त्र (Botany), प्राणिशास्त्र (Zoology)
६) संगणकशास्त्र (Computer Science), वनस्पतिशास्त्र (Botany), प्राणिशास्त्र (Zoology)

टीप : १) वेळापत्रकाच्या सोयीसाठी विषय गट वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार महाविद्यालयास राहील.
२) निवडलेले तिन्ही विषय प्रथम वर्षामध्ये अभ्यासलेले असले पाहिजे.

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

३) तिन्ही विषयांचे प्रत्येकी दोन पेपर असतील.
४) अर्जासोबत कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
५) महाविद्यालयाकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व विषय गटांना मिळून एकूण १२० विद्यार्थ्यांना गुणवत्ता व आरक्षण विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.

**तृतीय वर्ष–विज्ञान** (B. Sc. III)

**अ) आवश्यक विषय :** १) इंग्रजी (English) २) भारतीय राज्य घटना आणि स्थानिक स्वयंम सरकार ३) मुलाखतीचे तंत्रज्ञान

**ब) स्पेशल विषय :** **खालील पैकी कोणताही एक विषय**
१) वनस्पतिशास्त्र (Botany) २) संगणकशास्त्र (Computer Science) ३) संख्याशास्त्र (Statistics) ४) रसायनशास्त्र (Chemistry)

टीप : १) निवडलेला स्पेशल विषय द्वितीय वर्षामध्ये **(B. Sc. Part II)** अभ्यासलेला असलाच पाहिजे.
२) इंग्रजी विषयाचा एक पेपर व स्पेशल विषयाचे चार असतील.
३) अर्जासोबत कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
४) प्रत्येक स्पेशल विषयास विद्यार्थ्यांना गुणवत्ता व आरक्षण विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.
५) महाविद्यालयाकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व विषयांना मिळून एकूण १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

## कला शाखा (B. A.)

**प्रथम वर्ष – कला** (B. A. I)

**अ) आवश्यक विषय :** १) इंग्रजी (English) २) मराठी (Marathi) २) लोकशाही, निवडणूक आणि सुशासन ३) शारीरिक शिक्षण (P. E.) ४) भारतीय राज्य घटना आणि स्थानिक स्वयंम सरकार

**ब) ऐच्छिक विषय :**
गट–१ मराठी (Marathi), हिंदी (Hindi), इंग्रजी (English) व अर्थशास्त्र (Economics) **या चार विषयांपैकी कोणतेही तीन विषय निवडावेत.**
गट–२ भूगोल (Geography) व समाजशास्त्र (Sociology), **या दोन विषयांपैकी कोणताही एक विषय निवडावा.**

टीप :
१) वेळापत्रकाच्या सोयीसाठी विषय गट वाढविण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार महाविद्यालयास राहील.
२)शारीरिक शिक्षण (P.E.) हा १० गुणांचा सक्तीचा विषय असेल.
३) विद्यापीठाच्या आदेशाप्रमाने विषय/अभ्यासक्रमांमध्ये बदल होऊ शकतो.
४) अर्जासोबत कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
५) महाविद्यालयाकडून किंवा विद्यापीठाकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व विषय गटांना मिळून एकूण १२० विद्यार्थ्यांना गुणवत्ता व आरक्षण विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.
६) प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक १२ वीच्या निकालारोजी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. (मुदतीनंतर आलेले प्रवेश अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.)
७) मुदतीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास इतर ठिकाणी प्रवेश मिळाल्यास आमच्याकडील प्रवेश रद्द करून आपली मूळ कागदपत्रे परत नेता येतील.

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

## द्वितीय वर्ष – कला (B. A. II )

**अ) आवश्यक विषय :** १) इंग्रजी (English)
२) पर्यावरण अभ्यास – हा अभ्यासक्रम अनिवार्य आहे. (प्रकल्प अहवालासह)

**ब) ऐच्छिक विषय** (फक्त २): बी.ए. भाग १ ला अभ्यासलेल्या ऐच्छिक मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र यापैकी कोणताही एक आणि भूगोल व समाजशास्त्र या विषयांपैकी कोणताही एक विषय निवडता येतील.

**क) आंतरशाखीय विषय** (IDS) : **खालील तीन पैकी एक विषय**

१) सहकार (Co-operation)
२) महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास (HSRM)
३)सामाजिक परिसर विज्ञान/परिस्थितीकीशास्त्र (Social Ecology)

**आय. डी. एस. हा निवडलेल्या दोन ऐच्छिक विषयांपैकी किमान एका विषयाशी संबंधित असला पाहिजे.**

| **ऐच्छिक विषय** | **संबंधित (IDS) विषय** |
|---|---|
| १) मराठी | HSRM |
| २) हिंदी | |
| ३) इंग्रजी | |
| ४) अर्थशास्त्र | Co-operation /Social Ecology |
| ५) भूगोल | Social Ecology |
| ६) समाजशास्त्र | Co-operation / Social Ecology / HSRM |

टीप : १) वेळापत्रकाच्या सोयीसाठी विषय गट वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार महाविद्यालयास राहील.
२) निवडलेले दोन्ही ऐच्छिक विषय प्रथम वर्षामध्ये अभ्यासलेले असले पाहिजे.
३) दोन्ही ऐच्छिक विषयांचे प्रत्येकी दोन पेपर असतील.
४) अर्जासोबत कागद पत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
५) महाविद्यालयाकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व विषय गटांना मिळून एकूण १२० विद्यार्थ्यांना गुणवत्ता व आरक्षण विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.

## तृतीय वर्ष–कला (B. A. III)

**अ) आवश्यक विषय :** १) इंग्रजी (English) २) भारतीय राज्य घटना आणि स्थानिक स्वयंम सरकार
३) मुलाखतीचे तंत्रज्ञान

**ब) स्पेशल विषय :** १) मराठी (Marathi) २) हिंदी (Hindi)
३) इंग्रजी (English) ४) अर्थशास्त्र (Economics)

टीप : १) निवडलेला स्पेशल विषय द्वितीय वर्षामध्ये (B.A.Part II) अभ्यासलेला असलाच पाहिजे.
२) इंग्रजी विषयाचा एक पेपर व स्पेशल विषयांचे पाच पेपर असतील.
३) अर्जासोबत कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
४) प्रत्येक स्पेशल विषयास मर्यादित विद्यार्थ्यांना गुणवत्ता व आरक्षण विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.
५) महाविद्यालयाकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व विषयांना मिळून एकूण १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

## वाणिज्य शाखा (B. Com.)

### प्रथम वर्ष–वाणिज्य (B. Com. I)

१) इंग्रजी (English)
२) अकाऊन्टसी (Accountancy)
३) व्यावसायिक अर्थशास्त्र (Business Economics-I)
४) विमा (Insurance)
५) विपणनाची तत्वे (Principle of Marketing)
६) व्यवसाय व्यवस्थापन तत्वे (Principle of Business Management)
७) शारीरिक शिक्षण (P.E.)
८) लोकशाही, निवडणूक आणि सुशासन
९) भारतीय राज्य घटना आणि स्थानिक स्वयं सरकार

टीप : १) शारीरिक शिक्षण (P.E.) हा १० गुणांचा सक्तीचा विषय असेल.
२) विद्यापीठाच्या आदेशाप्रमाणे विषय /अभ्यासक्रमामध्ये बदल होऊ शकतो.
३) अर्जासोबत कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
४) महाविद्यालयाकडून किंवा विद्यापीठाकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे एकूण १२० विद्यार्थ्यांना गुणवत्ता व आरक्षण विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.
५) प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक इयत्ता १२ वी च्या निकाला रोजी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. (मुदतीनंतर आलेले प्रवेश अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.)
६) मुदतीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास इतर ठिकाणी प्रवेश मिळाल्यास आमच्याकडील प्रवेश रद्द करून आपली मूळ कागदपत्रे परत नेता येतील.

### द्वितीय वर्ष–वाणिज्य (B. Com. II)

१) इंग्रजी (English)
२) अकाऊन्टसी (Accountancy)
३) व्यावसायिक अर्थशास्त्र (Business Economics-II)
४) उद्योजकतेची मूलतत्त्वे (Fundmentals of Entrepreneurship)
५) पैसा व आर्थिक पद्धती (Money and Financial System)
६) व्यावसायिक संख्याशास्त्र (Business Statistics)

**पर्यावरण अभ्यास हा अभ्यासक्रम अनिवार्य आहे. (प्रकल्प अहवालासह)**

### तृतीय वर्ष–वाणिज्य (B. Com. III)

अ) आवश्यक विषय : १) व्यावसायिक पर्यावरण (Bussiness Environment)
२) व्यवसाय नियमन विषयक कायदे (Bussiness Regulatory Framework)
३) आधुनिक व्यवस्थापन पद्धती (Modern Management Practices)
४) सहकाराचा विकास (Co-operative Development)
५) भारतीय राज्य घटना आणि स्थानिक स्वयं सरकार
६) मुलाखतीचे तंत्रज्ञान

**ब) ऐच्छिक विषय :** १) Advanced Accountancy-Paper -I & II
२) Industrial Management-Paper-I & II

**वरील ऐच्छिक विषयांपैकी कोणताही एक विषय घेता येईल. त्याचे दोन पेपर असतील.**

टीप: १) अर्जासोबत कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
२) महाविद्यालयाकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे एकूण १२० विद्यार्थ्यांना गुणवत्ता व आरक्षण विचारात घेऊन प्रवेश दिले जातील.

**नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार शिवाजी विद्यापीठच्या मार्गदर्शक सुचनेनुसार विषयातील होणारे बदल सर्वांसाठी बंधनकारक राहतील. याची सर्व विद्यार्थी – विद्यार्थिनींनी नोंद घ्यावी.**

आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.

## कला शाखा (पदव्युत्तर विभाग) :

**M. A. I Economics : (Semester I)**

EC-1 : Micro Economics Analysis
EC-2 : Monetary Economics
EO-2 : Agricultural Economics
EO-4 : Principles and Practice of Co-Operation
- Marketing in Digital World
- Intership - I

**Note: Intake capacity 50 students on the basis of merit and reservation.**

**M. A. I Economics : (Semester II)**

89236 : Public Economics
89237 : Ecological and Resource Economics
89238 : Agricultural Development in India
89242 : Financial Markets And Institutions

**M. A. II Economics : (Semester III)**

EC-5 : Statistics in Economics Analysis
EC-6 : Macro Economic Analysis
EO-21 : Economics of Labour
ECO-3.2: Demography

**M. A. II Economics : (Semester IV)**

EC-7 : International Economics
EC-8 : Economics of Growth and Development
EO-36 : Advanced Banking
EO-37 : Welfare Economics

**Note : There may be changes in syllabus as per direction of the university.**

## वाणिज्य शाखा (पदव्युत्तर विभाग) : M. Com. I Advanced Accountancy

| Sr. No | Course Code | Subject | Paper No |
|---|---|---|---|
| | | **Semester - I** | |
| 1 | CC-AI | Business Management | |
| 2 | CC-BI | Managerial Economics | |
| 3 | DSE-AI | Advanced Accountancy | I |
| 4 | DSE-A II | Advanced Accountancy(Auditing) | II |
| | | **Semester - I I** | |
| 5 | CC-A2 | Organizational Behavior | |
| 6 | CC-B2 | International Business | |
| 7 | DSE-A III | Advanced Accountancy | III |
| 8 | BSE-A IV | Advanced Accountancy( Research Methodology) | IV |
| | | **M.Com. II Advanced Accountancy Semester - III** | |
| 1 | CC-C I | Management Accounting | I |
| 2 | CC-CD I | Business Finance | I |
| 3 | DSE-A-V | Advanced Accountancy (Taxation) | V |
| 4 | DSE-A-VI | Advanced Accountancy(Project Work & Viva Voce) | VI |
| | | **Semester - I V** | |
| 5 | CC-C2 | Management Accounting | II |
| 6 | CC-CD2 | Business Finance | II |
| 7 | DSE-AQ VIII | Advanced Accountancy (Costing) | VII |
| 8 | DSE-A-VIII | Advanced Accountancy(Contemporary issues in accounting) | VIII |

## १०) प्रवेश विषयक नियम (Rules for Admission)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ प्रमाणे महाविद्यालयीन प्रवेशाचे नियम खालील प्रमाणे आहेत.

**Preamble**

a) In accordance with the provision of the section 127 of Maharashtra Public Universities Act, 2016, the following rules shall be called the Admission Rule to be applicable to the non- professional under-graduate and post-graduate courses in the affiliated College / Recognized Institution / University Departments / Autonomous Colleges.

b) The admission rules for professional courses shall be as prescribed by the State Government from time to time.

**Under Graduate Courses**

1. Admission to non-professional under-graduate courses shall be strictly based on :
   a) Eligibility criteria as prescribed by the University from time to time.
   b) Reservation rules as prescribed by the state Government from time to time and adopted by the University.
   c) Merit, as measured by the marks scored in the qualifying / previous examination.
   d) In the case of courses where entrance test are prescribed, the admission shall be based on merit in the said entrance test subject to (a) and (b) above.
2. Incase of admission to under-graduate courses where the affiliated college/recognised institution / autonomous college has an attached Junior College, the total intake capacity at the first point of admission to the Senior College shall be divided as 80 percent for the students from attach Junior College and 20 percent for students from other Junior Colleges. However in the both cases, the basic rules of merit, reservation and eligibility shall apply. If 20 percent quota for students from other Junior Colleges remains unutilized, students from the attached Junior College shall be admitted from the waiting list.

   The merit of the students from other Junior College shall not be less than the merit of the last students admitted from the attached Junior College. In case, 80 percent quota for the students from attached Junior College remains utilized the college shall have the right to admit students from other Junior Colleges subject to the general rules given above.
3. In case of admission to the second and third year of the integrated degree courses, preference be given to the students of the same College / Recognized Institution / Autonomous Institution.
4. The foreign students shall be admitted to any course in any Institution / College affiliated to the University or in the Autonomous Institution on production of provisional eligibility certificate from the University. For obtaining provisional eligibility certificate the foreign student shall apply along with necessary certificates to the University in the form prescribed by the University and pay fees as prescribed by the University from time to time
5. Cancellation of admission and refund of money : Cancellation of admission and refund of money shall be as under :

**आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.**

A) All deposits such as CautionMoney, Library Deposit, Laboratory Deposit, etc. shall be refundable subject to such deduction as may be necessary on account of any damage to the property of the institution concert such a student may be responsible. The application for refund of such deposits shall be made with 6 months either from the date he / she leaves the college or completes the courses and the said institution shall refund the amount within 30 days from the date of receipt of the application.

B) Only tuition fee and no other fees shall be refundable.

C) Tuition fee shall be refundable as under :

a)The entire amount paid by the student after deducting 25% as administrative charge.

(i) If a student gets his admission cancelled before the commencement of the academic term.

(ii) If a student get his admission to another College or Institution providing course different from those in the College or Institution to which he had first sought admission and paid tuition fees provided always that he has kept the authorities of such a College or Institution informed in good time about his application for admission to another College or Institution, the application for refund of tuition fees in such cases, must be forwarded through the Principal of College or Institution which the student actually joins, giving pertinent details such as course selected by him, the date of his admission to the College or Institution etc.

b)50% of the amount paid by student as tuition fees, if he applies for cancellation of his admission and the refund of fees before the last days of admission to the College or Institution fixed by the University.

D) A student shall not be entitled to claim refund of tuition fees if he leaves the College or Institution after the last date of admission to such College / Institution.

E) In the case of student, who fails to inform the authorities of College or the Institution to which he has been given admission, about his insertion to leave or change the College or the Institution such as authorities shall be entitled to change full fees for the term or the year, as the case may be.

F) In the case of students getting admission to professional courses College, the claim for refund of tuition fees, etc. shall be made by concerned students within one week of admission to the professional courses and in such cases, the College shall deduct an amount of 10% of the fees paid as administrative charges. The seats failing vacant may be filled in by the College/recognised Institution from the waiting list.

G) Rules and regulations regarding admission fee, tuition fee and various other fees to be changed by the affiliated College/ Recognized Institution /Autonomous Institution at under-graduate levels shall be governed by the provision of ordinance as prescribed by the University from time to time.

It shall be the responsibility of the Principal to ensure that admission are as per rules, regulation and ordinance as prescribed by the University from time to time.

**Note** : The college has the right to refuse admission to a student with regard to maintaining discipline in the College, vide Maharashtra Public Universities Act 2016, Section 127(3 & 6). It is mandatory to submit undertaking regarding discipline while taking admission as per section 127 (7) of Maharashtra Public University Act 2016.

## आधार कार्डची झेरॉक्स प्रत व वैयक्तिक ईमेल आयडी प्रवेशाकरिता बंधनकारक आहे.

**महाविद्यालयाचे प्रवेशासंबंधी नियम** (Rules Regarding Admission)

प्रवेश अर्ज स्वत: विद्यार्थ्याने काळजीपूर्वक भरावयाचा असतो. पालकांची सही अर्जावर असणे आवश्यक आहे. तसेच ट्युशन फीच्या एकूण दोन हप्त्यांपैकी पहिला हप्ता प्रवेश अर्जाबरोबरच द्यावा लागतो.

प्रवेश अर्ज दोन्ही टर्मसाठी मानला जातो. एखाद्या विद्यार्थ्यास दुसऱ्या टर्ममध्ये कॉलेज बदलावयाचे झाल्यास दुसरी टर्म सुरू होण्यापूर्वी त्याने प्राचार्यांकडे लेखी अर्ज करून तसे कळविले पाहिजे. दुसऱ्या टर्ममध्ये अन्य कॉलेजात जाणारा विद्यार्थी पत्रकात नमूद केलेल्या सर्व वार्षिक फी वसूलीस पात्र असतो. म्हणून दुसऱ्या टर्ममध्ये कॉलेज बदलणाऱ्या विद्यार्थ्यांनी वेळेत प्राचार्यांना भेटून अर्ज करणे आवश्यक असते.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाचे प्रथम सत्र ३ जुलै, २०२३ रोजी सुरू होत आहे. नियमाप्रमाणे १८० दिवस अध्यापनाचे काम होणे आवश्यक आहे. याताठी दि. ३ जुलै, २०२३ पासून नियमित अध्यापन सुरू होईल. म्हणून सर्व विद्यार्थ्यांनी वेळेत प्रवेश घेऊन अध्यापनाच्या पहिल्या दिवसापासून आपापल्या वर्गात उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा प्रवेशामुळे व नियमाप्रमाणे हजेरी नसल्यास विद्यापीठाच्या परीक्षेस बसता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांना फी अगर इतर कोणत्याही सवलती मिळणार नाहीत. या संदर्भात होणाऱ्या नुकसानीस कोणत्याही प्रकारे महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

**अ) बी. ए. / बी. कॉम. / बी. एस्सी. भाग-१**

प्रवेशासाठी पुढील अटी आहेत-

१) १२ वी पास, मूळ मार्कलिस्ट व झेरॉक्स २ प्रती.
२) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व झेरॉक्स २ प्रती
३) डी.टी.एड./डी.एड. असल्यास डी.टी.एड./डी.एड. चा मूळ दाखला व मार्कलिस्ट.
४) १० वी चे मूळ मार्कलिस्ट व दाखला ३ झेरॉक्स प्रती
५) विद्यापीठ पात्रता अर्ज
६) कर्नाटक टी.सी. एच. असल्यास दहावीला इंग्लिश विषय असणे आवश्यक आहे.
७) पात्रतेच्या प्रमाणपत्रासाठी (Eligibility Certificate) (सर्व शाखा वर्गासाठी) विद्यापीठाकडे करावयाचा योग्य नमुन्यातील अर्ज व त्याचे ७५/- रुपये शुल्क (जर उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेऐवजी एखादी समकक्ष परीक्षा विद्यार्थी उत्तीर्ण झाला असेल तर त्याला पात्रतेच्या प्रमाणपत्रासाठी १५०/- रुपये शुल्क) भरावे लागते.
८) महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यानंतर एक महिन्याच्या आत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र मिळवले पाहिजे, अन्यथा प्रवेश रद्द केला जाईल.
९) ई- सुविधा (e-suvidha) मार्फत ऑनलाईन स्वतंत्र प्रवेश अर्ज भरावा लागतो. यासाठी वेगळे शुल्क रु.५०/- भरावे लागेल.

**प्रवेश प्रक्रिया** (Admission Procedure)

दरवर्षी १२ वी चा निकाल जाहीर झाल्यानंतर महाविद्यालयाकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे राज्य शासनाचे आरक्षण धोरण व इयत्ता १२ वी च्या परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे प्रवेश दिले जातात. मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जात नाहीत. येथे गुणवत्ता यादी (Merit List) प्रमाणे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी मुदतीत प्रवेश शुल्क भरून आपला प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. अन्यथा आपल्या जागी प्रतीक्षा यादी (Waiting List) मधील विद्यार्थ्यास प्रवेश दिला जाईल. महाविद्यालयाकडून आपणास प्रथम मिळालेल्या जागेवर आपला हक्क राहणार नाही आणि याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

> **टिप : सन २०२३ - २४ या शैक्षणिक वर्षात सर्व शाखांच्या प्रथम वर्षाचे (B.A./ B. Com. / B. Sc.- Part 1) चे प्रवेश शिवाजी विद्यापीठ मार्गदर्शक सुचनेनुसार होणार आहेत. नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या नियोजित अमलबजावणी नुसार विद्यार्थ्यांच्या विषय निवडीमध्ये होणारे बदल सर्वांना बंधनकारक राहतील.**

**ब) बी. ए./बी. कॉम./ बी. एस्सी. भाग - २**

प्रथम वर्षाच्या परीक्षेच्या गुणपत्रकाची एक सत्य प्रत अर्जासोबत जोडावी आणि विद्यार्थ्यांना ई-सुविधा (e-suvidha) मार्फत ऑनलाईन स्वतंत्र प्रवेश अर्ज भरावा लागतो. यासाठी वेगळे शुल्क रु.५०/- भरावे लागेल.

**प्रवेश प्रक्रिया** (Admission Procedure)

